December 31

सारखे उपरोधिक, कुत्सित न बोलणारे, आपापल्या अस्मितांचा बडेजाव न माजवणारे, कुणाचीही हेटाळणी न करणारे -- अशा सर्व पुरोगाम्यांना माझे सादर वंदनच असेल !

Edit

Champra Deshpande replied to Satish Tambe's comment.

आता लेखक म्हणून आपण बौद्धिके नको घ्यायला ! या पुरोगाम्यांनी खूप सांस्कृतिक नुकसान केले आहे, असे माझे आकलन आहे, तरीही मी तुमचेच ढोलताशे वाजवू ? कुणाच्याच बाजूचा नसलेले तर संख्येने फारच नगण्य आहेत -- पुरोगाम्यांहून खूपच कमी -- त्यांचेही राहू द्या की अभिव्यक्तिस्वातंत्र्य ! आकलनभिन्नता व्यक्त करणे सर्वांचेच चालणार -- हे तरी व्यक्त का केले जाते -- ते नेहमीच जिंकण्यासाठी नसते -- हेही समोर यावे -- हेही पाहिले जावे, यासाठीही ते असू शकते --

खूप आहेत रे तसे अभंग -- हा एक घे --

' तुका म्हणे एकविध झाले मन ।

आणखी घे --

तुका म्हणे एक मागे ।
एकपणा नाही भंग ।।

-- परंतु, तुझी मते खोडण्यात मला इंटरेस्ट नाही, हे तुला माहीत आहेच --

Champra Deshpande replied to Satish Tambe's comment.

जे सतत दुसऱ्यांना शिकवत असतात तेही त्याच मातीचे का, हा प्रश्न विचारणे इष्ट असतेच ! सब गोलंकार असून आम्ही फार शहाणे असे म्हणणाऱ्यांना आरसा दाखवणे वाईट का ठरावे ?

वर्षारंभी जरूर ऐकावा असा अभंग --

https://www.youtube.com/watch?v=MjwWMO9vARg

पांघरुण -- आवरण --

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचे चिंतन ॥१॥ येथें नसतां वियोग ।लाभा उणें काय मग ॥२॥ छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥३॥ तुका ह्मणे हरिच्या दासां । शुभकाळ अवघ्या दिशा ॥४॥ -- संत तुकाराम.

-- ही महाराष्ट्राची संस्कृती विसरलेले खोटारडे पुरोगामी !

-- देव म्हणजे एखादी मूर्ती असा बावळट विचार समजू नये -- तुकारामाच्या आकलनात देव म्हणजे ' एकविध मन ' !

Champra Deshpande commented on Waman Kendre's post.

खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on Vasant Dahake's post.

खूप शुभेच्छा, सर !

Champra Deshpande commented on Ratnakar Mahajan's post.

तुम्हालाही खूप शुभेच्छा !

कुणीही ' भरून पावलो ' असे म्हणावे इतका भरपूर आशीर्वाद देणारी पोस्ट !

December 29

Champra Deshpande commented on his own post.

‘लाली’ पुन्हा एकदा सर्वोत्कृष्ट

maharashtratimes.indiatimes.com

https://maharashtratimes.indiatimes.com/maharashtra/pune-news/lali-once-again-the-best/articleshow/73021780.cms

पुणे : पुरुषोत्तम करंडकावर अहमदनगरच्या ‘लाली’ची मोहोर । eSakal

esakal.com

तुमचा ऍड्रेस रेकग्नाईज होत नाहीय -- दुसरा आहे का ?

डॉट आणि कॉम यामध्ये तुम्ही स्पेस सोडली होती, त्यामुळे तसे होत होते -- आता पोचले असेल --

पुणे : पुरुषोत्तम करंडकावर अहमदनगरच्या ‘लाली’ची मोहोर । eSakal

esakal.com

रंगवाचा ला पाठवणार आहे --

'खरे कलाकार काहीच हेटाळत नाहीत -- निवाडा करण्यापेक्षा ते समजून घेत असतात.'

ही मूल्यात्मकता असणारी मराठीतली नाटके -- वाडा चिरेबंदी, सखाराम बाइंडर आणि एक शून्य बाजीराव. बाकी तुझ्याशी बरेच मतभेद आहेत, त्याला इलाज नाही.

Champralekhan

champralekhan.com

www.champralekhan.com इथे माझे सर्वच लेखन उपलब्ध आहे --

आधी हबकतो आणि मग हतबल होत जातो !

Girish Patke's photo.

खूप शुभेच्छा !

खूपजणांना आवडते -- माझ्या प्रतिक्रियेवर जाऊ नका -- असे म्हणायचे आहे --

तुमच्याकडून काहीच चूक नाही, हे मी लिहिलेच आहे --

Rajesh Deshpande mentioned you in a comment.

Champra Deshpande तुमच्या मताचा आदर..तुम्ही म्हणताय तसे नाटक करायला किंवा बघायला पण आवडेल..फक्त आमच्या नाटकात नेमकी चूक कशात झालेय ते कळले तर सुधारण्याचा प्रयत्न करू.अर्थात लेखनात बदल नाही करू शकत आम्ही .तो आमचा अधिकार नाही.मना पासून आभार!

ते ठीक -- पण, मोठा माणूस हा असा ?

जॅस्मिन तेल वापरले जातेच ना --

इथे एक कॉमेंट होती -- तिला उत्तर म्हणून वरील मजकूर लिहिला आहे -- पण, नंतर ती मूळ कॉमेंट काधून टाकली गेली आहे --

हाच तर प्रॉब्लेम आहे भूमिकेच्या नावाखाली कलेचे सैनिकिकरण करू पाहणाऱ्यांचा -- सगळ्या जगाने फक्त विद्रोही टाईप कलानिर्मिती केली पाहिजे असे त्यांना वाटते -- आणि हेच लोक अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या गप्पा मारत असतात !

त्याला प्रत्यक्ष हवेत उडताना दाखवावे लागेल असे दिसत नाही -- ती खिडकीतून वर बघत बोलते, असे काही होऊ शकेल. पण, सादरकर्त्या समूहाने ते ठरवावे.

मतभेद आणि वैचारिक स्वातंत्र्य यांच्या बाबतीत प्रश्न येऊ नये -- त्यात व्यक्तिगत राग वगैरे नसला म्हणजे झाले --

कोण माकडे, कोण देशविघातक, कोण फूटपाडे, कोण विकासविरोधक, कोण शेतकऱ्यांचे तारणहार -- यावरच तर चालू असतात ना मतभेद !

' साथी न कोई मंजिल -- '

पाठिंबा देण्याचा प्रश्नच नाही व मी तसे म्हणतही नाही.

Yusuf Shaikh द्वेष सर्वांनीच सोडणे योग्य होईल -- ब्राम्हण समाजाकडे सूज्ञपणा, समंजसपणा वा अग्रेसरपणा आहे आणि इतरांकडे तो नाही, असे काही मानणे योग्य वाटत नाही -- आणि दुर्लक्ष करायचे म्हणजे काय करायचे -- पाठिंबा द्यायचा ?

Champra Deshpande सर्वांनी उदार भूमिका घेतली तर उत्तम होईल. पण संपूर्ण समाज तितका सूज्ञ व समंजस नाही. ब्राह्मणसमाज याबाबत अग्रेसर आहे. त्यांच्या काही अपेष्टामुळे त्यांच्यातील काही मोठी नुकसानकारक भूमिका घेतात.

Champra Deshpande evidently the absence of evidence is not evidence of absence and presence of substantiating incidences may corroborate the contention.

Champra Deshpande वाक्य मजेशीर आहे, इतपत ठीक आहे. नाहीतर भुतंखेतं, जारण मारण, भानामती, पुनर्जन्म... कशाकशाला हे लागू करता येईल.

म्हणजेच संशयास्पद -- असेलही वा नसेलही !

या बाबतीत एक मजेशीर वाक्य वाचनात आले -- The absence of evidence is not evidence of absence -- म्हणजे -- पुरावा नसणे हा नसण्याचा पुरावा नसतो --

ब्राम्हण समाजाने उदार भूमिका घ्यायची म्हणजे काय करायचे ? जे त्यांची कुचेष्टा करत असतील त्यांना पाठिंबा देत राहायचे ? की तुमची काही वेगळी कल्पना आहे ? आणि उदार भूमिका सगळ्यांनीच घ्यावी असे का म्हणू नये ?

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's post.

बाप रे ! नव्या वाचनाचे तर राहूच दे, वाचलेले विसरण्याचा आहे माझा असाच झपाटा !

' उभा चढ ' आणि ' खडा उतार ' म्हणावे झाले !

नवे निश्चलनीकरण

loksatta.com

पण, मी माझ्या मित्रांबरोबर नसलो तरी तटस्थ मुळीच नाही. मी आजच यावर एक पोस्ट देईन --

Mangesh Narayanrao Kale mentioned you in a comment.

नवे निश्चलनीकरण

loksatta.com

Champra Deshpande आपण योग्य अयोग्य बोलला नाहीत हेच तर चिंतेचे कारण। सामान्य माणूस एकवेळ याचे नीटसे आकलन करू शकत नाही हे एकवेळ समजण्यासारखे आहे कारण तो त्याला दिसणारे वरवरचे स्तर तेव्हढे पाहू, अनुभवू शकतो, पण एखादा लेखक असे तटस्थ असल्याचे कसे म्हणू शकेल। नि आपण महत्वाचे लेखक आहात ये आजवरच्या आपल्या लेखनातून ज्या जीवन जाणिवा आपण जोरकसपणे अधोरेखित केल्या, त्या लेखनाचे मूल्य जोपासले त्यामुळे। मागे नेमाडेंसारख्या मोठ्या कवी, लेखकाने मोदी प्रतिमा आपल्या पुस्तकाच्या मलपृष्ठवर छापून त्यांची भूमिका काय आहे हे दाखवून दिले होते, किंवा तेंडुलकर यांची दुसऱ्या बाजूने रोखठोक भूमिकाही, असो माझे म्हणणे तुमच्या पर्यंत पोहचवण्यात मी कमी पडलो असे मी समजतो।

नवे निश्चलनीकरण

loksatta.com

मी योग्य-अयोग्य असे काही बोललेलो नाही -- आणि परिस्थितीचे आकलन अमुकच योग्य आणि बाकीचे चिंताजनक ही कल्पनाच मुळात निरर्थक आहे -- मतेमतांतरे या स्तरावर मौल्यवान काही असू शकत नाही, हाच तर मूलभूत प्रश्न आहे -- तिकडे दुर्लक्ष केले तरच महत्त्वाचा लेखक, असे असेल तर मला ' महत्त्वाचा लेखक ' कुणी म्हणावे यात मला इंटरेस्ट नाही. पण, मी माझे आकलन ( खरे तर आकलनाचा अभाव -- जो सर्वांतच आहे ) मांडणारी एक पोस्टच देण्याच्या विचारात आहे. जे घडतेय ते आपोआप आकाशातून घडत नाहीय -- आपली सर्वांची मने करप्ट असल्याने घडतेय. हे मला दिसत असूनही माझे चार मित्र मला कसे शहाणा आणि महत्त्वाचा लेखक म्हणतील अशा मार्गाने मी जाणार नाही.

Mangesh Narayanrao Kale mentioned you in a comment.

नवे निश्चलनीकरण

loksatta.com

Champra Deshpande एका महत्वाच्या लेखकाने असे विधान करावे हे चिंताजनक आहे। की नाटककाराचे जग,नि त्याची सो कोल्ड वास्तव, कल्पित सृष्टीत नागरिक नावाची गोष्ट येत नाही? की हा जो काय अजागळ अनाचार जे दोन अर्धशिक्षित उपटसुम्भ देशाच्या बोकांडी मारताहेत तो योग्य वाटतोय सर तुम्हाला?

नवे निश्चलनीकरण

loksatta.com

म्हणजे, भारतीय जनतेला भारताबाहेर ( म्हणजे कुठे ) काढायचा हा कार्यक्रम आहे ? यावर विश्वास ठेवणे मला जरा अवघड जातेय ! मला टॅग केल्यामुळे हे बोललोय, अन्यथा, मला हे संवादाचे विषयच वाटत नाहीत !

Champra Deshpande replied to Prabhakar Bhatlekar's comment.

उदा आयोनेस्कोचे ' ऱ्हिनोसेरस ' हे नाटक घ्या. त्यात प्रत्येक माणसाचे रूपांतर ऱ्हिनोत होत जाते, असे आहे. पुण्याच्या पीडीए ने त्याचा प्रयोग ' गेंडा ' या नावाने केला होता. त्यात गेंड्याचे १५-२० मुखवटे लागले होते.

कोणतीही भीती म्हणजे सामाजिक-राजकीय व्यवस्थेचा परिणामच -- असेही काहीजण मानताना दिसतात --

या प्रश्नांना मखलाशी म्हणणे म्हणजे आपल्या कोशात राहण्यासाठी शोधलेली पळवाट आहे, असे का म्हणू नये ? कलेबाबत पडणाऱ्या प्रश्नांची हेटाळणी करणे हे कुणाच्याच हिताचे नाही -- खुद्द देवाला रिटायर करा म्हणणारे लागू समजा तुमचे दैवत आहेत -- त्यांच्या निमित्ताने प्रश्न निर्माण होता कामा नयेत ?

मानसिक हालचाली व्यक्त करण्यासाठी अनिर्बंध स्वातंत्र्य वापरणे --

अरे वा ! ताज्या आठवणी अधिकच ताज्या झाल्या !

त्यांच्याबाबत आज मीही एक पोस्ट दिली आहे.

Champra Deshpande commented on Girish Patke's post.

सत्यस्फोटक ! शेयर करतोय --

निव्वळ बुद्धीने निष्कर्षात्मक बोलणे तर ऍब्सर्डिटीच !

तसे तर काहीजण करत असतातच -- तेच फक्त ' सत्य ' असे नाही म्हणता येत --

तुकारामाने विठ्ठलाबद्दल बोलण्यासारखेच हेही अर्थपूर्ण असू शकेल --

सिद्ध होईल तेव्हा होईल -- सध्या या गोष्टींचे अस्तित्व नाकारून टाकावे का असा प्रश्न आहे --

आणि इतरांची कारस्थाने ओळखून सावध बसलेली बेरकी माणसे !

Champra Deshpande commented on Rahul Bansode's post.

अरे ग्रेट ! चहाबरोबरच या राहुलबद्दलही आदर, प्रेम हे सगळे दुणावले ! खरोखर राष्ट्रीय एकात्मता कोण घडवत असेल तर तो चहाच ! दिलखुश लेख !

याचे रूपांतर असे होणार -- " तो त्यांचा इतिहास जाळा -- आमचा महत्त्वाचा, प्रेरणादायी आहे, तो हवाच ! " इतिहास हा बाहेरची पुस्तके जाळून जळणार नाही -- तो मनात जाळावा लागेल --

शिंगे वयाबरोबर वाढत जातात, हा एक साधा विचार --

मला कधीही चालतो चहा !

Kirankumar B. Bhujbal पण मला ते काम काही येणार नाही -- त्यामुळे त्या खुर्चीवर बसायची हौस मी करणार नाही --

माझी एकट्याची अनुयायी शून्य असलेली घमासान पार्टी !

मानवी संबंधांतले, त्यांतल्या असंख्य गुंतागुंतींसह भान व्यक्त करणे हे कलेचे प्रमुख काम दुर्लक्षून, कुठेतरी दोषारोप आणि कशाचीतरी भलावण करणे असे कलेला परिवर्तनवादी स्वरूप दिले की ढोबळपणा आणि तोच तोचपणा येणारच. तेच महत्त्वाचे वाटणारे प्रेक्षक आणि परीक्षक असतील तर ते घडत राहणारच. नायक-खलनायक हा कलेतला ढोबळपणा वर्षानुवर्षे आवडीने चालवून घेतला जातो, तसेच हे समजावे.

कम्युनिस्टांनीही त्यांच्या कार्यकर्त्यांना पूजा, उत्सव यांत सामील व्हायला सांगितले आहे ! पण, राजकारणात ' यश ' मिळवणे हा हेतू नसेल तर प्रॉब्लेम येऊ नये --

नीतीमान, बुद्धीमान, धर्मनिरपेक्ष, प्रामाणिक आणि कार्यतत्पर -- या शब्दांचे तुमचे अर्थ वेगळे असले तर लोकशाहीत जनतेला कसा दोष देणार ? लोकांच्या शहाणपणावर विश्वास असणे म्हणजेच लोकशाही !

Mangesh Narayanrao Kale सध्या आत्ताच ' मराठी साहित्यात ' ही कविता दिलीय -- ती बघ वाचून --

माझे अज्ञान उघडे नको पाडूस प्लीज -- काहीतरी संदर्भ असेल असे वाटतेय ना -- उतनाही मेरा स्किल है !

माझे ' एक गगनभेदी किंचाळी ' हे नाटक याच विषयावर आहे --

The goose is out -- या नावाचे ओशोंचे एक पुस्तक आहे.

माझा ' नातं ' हा दीर्घांक विनयने एकदा दिग्दर्शित केला होता. त्या वेळी तो दूरदर्शनमध्ये होता. मी तिथे जाऊन त्याला भेटलो होतो.

डोळ्याचे रूट कॅनॉल ना ? होऊन जाईल -- घाबरू नका !

लावण्य काय आणि कांदा काय -- ' दिसेनाशी होईपर्यंत ' च्या अलिकडे थांबावे हेच इहवादात आवश्यक !

सत्याला सामोरे जावेच लागणार, हे समजणारी नकळत मजेदार मदतनीस !

Champra Deshpande commented on Renuka Khot's post.

दिङ्मूढ करणाऱ्या परिस्थितीवरची उलथापालथ घडवणारी भयानक प्रतिक्रिया ! सर्व वर्तमानपत्रांत दर आठवड्याला ही पोस्ट छापावी -- पण, वाचतील का ते सज्जन ? इथे फेसबुकवर आणखीही काही अशाच जहाल पोस्ट आहेत -- त्या सर्व अधिकाधिक लोकांच्या वाचनात याव्यात -- Mukesh Machkar यांना विनंती -- हे सगळे एकत्र करावे --

हं -- आले लक्षात -- पनवेलची गोष्ट दिसतेय ही --

Champra Deshpande commented on Shivkanya Shashi's post.

मेंदूत अकलेचा खिळा ठोकणारी भेदक-भयंकर कविता ! सर्व भाषांत अनुवाद करून ही चौकाचौकात लावावी --

Edit

Deepali Kulkarni mentioned you in a comment.

Champra Deshpande , Sunil Deo hyanni digdarshan kele hote, natak akkhe ubhe rahile hote, durdaivane producer chya adchaninmule sadar karta ale navte. Pan khup kahi shikayla milala

Edit

Champra Deshpande replied to Deepali Kulkarni's comment.

अरे वा -- हे नव्हते मला माहीत -- ' नातं ' हा सादर करायला एक आव्हानात्मक दीर्घांक आहे -- तुम्ही कुठे केला होता हा प्रयोग ? दिग्दर्शन कुणाचे होते ? या निमित्ताने तुला शुभेच्छा !

Deepali Kulkarni mentioned you in a comment.

Champra Deshpande sir... माझ्या कवितेला तुमची दाद मिळणं ही माझ्या आयुष्यातली खूप मोठी कॉम्प्लिमेंट आहे..! " नातं " या तुमच्या याच विषयाशी निगडीत नाटकनेच माझ्या ह्या प्रवासाची सुरुवात झालेली.!

आणखी एक -- इथे बसवलेले अनाउन्सर ते काय बोलताहेत हे कुणालाही कळता कामा नये याची खात्री करूनच बसवलेले असतात --

एक तर भक्त सगळीकडेच असतात असे माझे निरीक्षण आहे. अर्वाच्च वितंडवाद कधीही वाईटच. कुणालाही, चाललेल्या विषयावर, विषारी न होता, आपले म्हणणे मांडता आले पाहिजे. आपले मत म्हणजे आकाशवाणी आहे, असे कुणीच समजू नये. इतरांच्या मतांनाही आदरपूर्वक वाव ठेवणे, हे लोकशाहीत अतिमहत्त्वाचे आहे.

माझ्या लेखनात क्लायमॅक्स नसतो --

' माझा मित्र असे म्हणतो की बर्ट्रांड रसेल असे म्हणतो -- "

या अंधश्रद्धा नसून माणसाला आत्मवंचनेसाठी लागणाऱ्या उपयुक्त संकल्पना आहेत, हे समजून घ्यायचे !

Champra Deshpande commented on Ashutosh Potdar's post.

अरे, जबरदस्त ! तुमची पहिलीच कविता वाचली !

आपली मते ठाम असणे म्हणजे जणू काही आपल्याला सत्यच समजलेले असणे, हा भ्रम सार्वत्रिकच दिसतो -- इतरांची काही वेगळी मते असतील याची समजूत वा लवचिकपणाच नाही --

राजकारणात ठाम मतांना फारसा अर्थ नसतो -- एकमेकांना राक्षस म्हणणारे अचानक प्रेमात पडतात -- नेत्यांना हे समजते, अनुयायांचाच प्रॉब्लेम असतो -- ते कट्टरपणाचे प्रदर्शन करत राहतात -- तिघांनीही लवचिकता पत्करल्यामुळेच हे शक्य होतेय -- कट्टर मते, कट्टर स्वभाव, कट्टर भूमिका यांच्यांतला फोलपणा हाच तर माझ्या लेखनाचा आशय असतो --

तपासावे जरूर पण प्रत्येकाला वाटते की आपलेच उत्तर बरोबर -- त्यामुळे, मानवी बुद्धीची मर्यादा म्हणूनही हे पाहावे --

हे एकत्र येतील हे तरी कुठे कुणाच्या डोक्यात होते ?

हे मेंदूतल्या कमीजास्त रसायनांमुळे असेल की अग्रक्रमच वेगळे असल्यामुळे असेल, असा प्रश्न पडला -- अग्रक्रम तरी का वेगळे, हा आणखी एक प्रश्न पडला --

किंवा मग, " नम्रतासे कहो, हम हिंदू है ! "

प्रश्न दोन मिनिटे विचारून उत्तर मात्र १५ सेकंदांत द्या, असे म्हणतात !

Champra Deshpande commented on Mangesh Narayanrao Kale's post.

काळ आणि काळोख यांचा भेदक खेळ !

Champra Deshpande commented on WinPoint Learning Center's video.

" आमच्या मुलाची / मुलीची जिंदगी इथे घडली " असे म्हणणारे पालक ही तुमची ग्रेट कमाई आहे !

वा ! खूप शुभेच्छा ! माझे पहिले पुस्तक विद्याधर पुंडलिक यांच्यामुळेच निघाले -- ' इतिहास आणि इतर एकांकिका ' -- वसंत मिरासदारांच्या सुपर्ण प्रकाशनाने काढले !

अंगठेबहाद्दराचे खाते उघडताना बँकेत फोटो मागितला जाई -- तेव्हा आमचे एक ऑफिसर त्या खातेदाराला सांगत -- " तुमचा फोटो लागेल -- बालपणातला नको -- सध्याचा लागेल -- आणि अशी दाढी नेहमीच ठेवणार का -- मग दाढीवालाच आणा -- दिसण्यात सारखे बदल करू नका --"

रावसाहेबांना माझ्या खूप शुभेच्छा ! माझा एक लेख वाचून, माझा नंबर मिळवून त्यांनी मला फोन करून तो लेख आवडल्याचे कळवले होते !

' हाकलणं ' हा शब्द नको -- संपर्क थांबवणं म्हणू -- विस्तवाला हात लावल्यावर भाजते, हे कळल्यावर आपण तिथे हात लावणे टाळतो !

असहिष्णुता असूनही आपल्याला तिचा त्रास होत नाही, असाही एक प्रकार असू शकेल. पण, ते जाईल आध्यात्मिक क्षेत्रात -- ते चालेल तुम्हाला ?

माणसांच्या विचारसरण्या ठरण्यातही त्यांचे जनुक नकाशे कारणीभूत असतात, असे म्हणतात -- असे विश्लेषण पाहात गेले तर सगळेच बरोबर आणि अटळ म्हणावे लागेल ! मग, तुम्हीही कुणावर याचे खापर फोडणे निरर्थक ठरेल ! जग सुधारल्यावर मी सुधारेन -- याला काय अर्थ राहील ?

मग काय, असहिष्णुता सहन करत बसणे म्हणजे सहिष्णुता ?

सगळ्या गोष्टींची समर्थने शोधण्यापेक्षा इथे मित्रांनी एकमेकांशी नीट वागायला सुरुवात करावी, हेच चांगले होईल.

भूमिकांचा चिवडा किंवा काला !

वेगवेगळा अँगल समोर येत राहणे हेच संवादाचे फलित मानावे -- सहिष्णू संवाद होत राहावेतच --

तेच तर चालू आहे दोन्ही बाजूंनी -- ' मुख्य मंत्रीपदही ' असे स्पष्ट झाले नव्हते हेच दोघांच्याही बोलण्यातून दिसतेय --

कुत्रा फाडोगे या कुर्ता ?

Nitin Chavan mentioned you in a comment.

Champra Deshpande सर खूप पत्रकार या कामी तुम्हाला मदत करू शकतील. माहिती ते देतील तिची विश्लेषणात्मक किंवा तुम्हाला अपेक्षित वैचारिक मांडणी तुम्ही करावी असे वाटते.
सर तुमचा वकूब खूप मोठा आहे. मी अतिशय नम्रतेने हे तुम्हाला सांगतो आहे.

Gautam Ainapure जसे पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक तसेच राजकीय. त्या साहित्य कृतीतला कच्चा माल -- माहोल राजकीय सत्तावर्तुळाशी संबंधित असणे --

फादर साहेबांनी आणखी एक उदाहरण दिले आहे. ते आहे -- इकडे वडाची पूजा करायची आणि तिकडे झाडांची कत्तल करायची -- हे ! मग जगात ख्रिश्चन लोकांनी झाडांच्या किती कत्तली केल्या याचा काही हिशोब आहे का त्यांच्याकडे, हे विचारावे लागेल. पर्यावरण राखण्याचा धर्म पायदळी तुडवण्याचे काम करणाऱ्या एका गठित धर्मातून त्याच्याहून घाणेरड्या दुसऱ्या गठित धर्मात ते का निमंत्रण देतात, हे विचारावे लागेल. सर्व धर्मांतली सर्वच कर्मकांडे, यमनियम आणि वर्तनमार्ग हे प्रत्यक्षात कुठेच आचरणात नसतात, हे सत्य पाहायला हवे. नुसताच इथे पुरोगामीपणा करण्यात काय अर्थ आहे ? पुरोगामीपणाचा प्रचार धार्मिक भेदांवर आधारित असणे, हे वादाचे होईल, हेच इथे सुचवायचे आहे. असाच आणखी एक मुद्दा आहे -- तो म्हणजे अयोध्या निकालाबद्दलचा. तरुणांना रोजगार महत्त्वाचा आहे की मंदिर असे काही ते विचारतात. रोजगारच महत्त्वाचा, हेच उत्तर बरोबर आहे, त्यात वाद नाही. पण, धार्मिक उन्माद हा एकूण मानवातच असणारा वेडेपणा आहे, हेही पाहता आले पाहिजे. ते पाहता येत नसेल तर याला ' भोळा ' किंवा ' भोळेपण पांघरलेला ' पुरोगामीपणा म्हणावे लागेल. मांजर डोळे मिटून दूध प्याले म्हणजे ते कुणाला दिसतच नाही, असे नाही. आपलाच धर्म सर्वश्रेष्ठ मानणे हाही त्याच उन्मादाचा प्रकार असतो, हेही समजायला हवे. पण, जाने दो -- आपल्याला साहित्य संमेलनासाठी पुरोगामी अध्यक्ष मिळालेत हे ठीकच आहे. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी एकूणच पुरोगामीपणाबद्दल मराठी रसिकांचे उद्बोधन करावे, हीच अपेक्षा.

वा ! मजेदार वैताग !

Champra Deshpande commented on Hakara Bilingual's post.

धन्यवाद, हाकारा !

प्रत्येकाला आपला द्वेष हा ' विवेकी द्वेष ' वाटतो -- हाच तर आहे प्रश्न !

अर्थात -- त्यालाच मूलभूत प्रश्न म्हणता येईल -- वैचारिक आदर्शवाद आपल्याला आवडतो कारण मूलभूत प्रश्न टाळायला त्याचा उपयोग होतो.

चिंतन पासून चिंतनीय, वाचन पासून वाचनीय, मनन पासून मननीय -- असे वापरात तरी आहे.

Nitin Sule माणसाने कोणत्या ना कोणत्या द्वेषासहच जगले पाहिजे का -- या प्रश्नाला तरी निदान जगण्यात स्थान द्यायला हवे. द्वेषाशिवाय माणूस जगूच शकत नाही हा निष्कर्ष म्हणजे निराशावाद तर आहेच पण शिवाय जगण्यातल्या मूलभूत प्रश्नाची टाळाटाळही आहे.

हे चेष्टेवारी न्यायचे ठरले तर आहे हे सगळ्यांचेच सगळेच समर्थनीय म्हणावे लागेल -- मीच फार समतावादी याला काय अर्थ राहील ?

Champra Deshpande commented on Anil Govilkar's post.

किती प्राणपणाने ऐकलेय तुम्ही हे सगळे ! त्या काळातल्या गाण्यांचा मीही एक प्रेमिक आहे. एसडींबद्दल आदर आहेच, तसाच आता तुमच्याबद्दलही ! अत्युत्तम !

शीण नाही -- गंमत -- सध्या दुसरे काही काम चालू नाहीय --

ग्रेट अभिनेता ! " अगं, तवा म्हणजे उथळ कढईच की ! " हा त्यांचा हास्यस्फोटक संवाद लक्षात राहिलाय चांगलाच !

पवार आदरणीय आहेतच पण ते सोडून बाकी सगळे बेजबाबदार आहेत, असे नाही. मुख्यमंत्र्यांनीही सरकारतर्फे या नुकसानीबाबत काय कार्यवाही चालू केलीय ते सविस्तर सांगितले.

" अब रुलाओगे क्या ? ' -- असे पूर्ण महाराष्ट्रच म्हणतोय !

Champra Deshpande commented on Priya Jamkar's post.

' भवतालाचा न्यायनिवाडा न करणारी कविता ' हा मुद्दा महत्त्वाचा आहे. व्यक्तिगत मानके मनात बाळगून कविता लिहिणारेच खूप असतात. तसे नसणे हे प्रियाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

अरे, त्यांनी माझी एक ओळही वाचलेली नाही -- नुसती सांगोवांगीची माहिती की मी लिहितो. विशेष म्हणजे ते प्रेमानेच बोलत असतात आणि आपण काही चांगले बोलतोय, अशीच त्यांची कल्पना असते ! मला आऊट करण्यासाठी नसतातच ते बॉल्स ! मीच आपले, बचाव करत ते सोडून देतो !

अहो, नियमाने जे चालते त्याला अशुद्ध नाही म्हणत. नव्या शुद्धलेखनाप्रमाणे असणेच योग्य, असे मी समजतो.

आता ' तज्ञ ' चालते. पाहा -- ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' -- यास्मिन शेख.

Champra Deshpande commented on Varshha Mahajan's post.

पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटणारी संपृक्त कविता !

Swapna Pataskar's photo.
मी त्यात एक सदर लिहायचो. हेमंत एदलाबादकरही लिहायचा. संपादक गिरीश रांगणेकर होता. Champra Deshpande..संपादकीय सल्लागार होते.

मी हे रोमँटिकपणे लिहिलेले नसून ॲब्सर्डिटी उघडी पाडण्यासाठी लिहिलेले आहे.

काल काँग्रेसने युतीत काडी टाकून पाहिली की आम्ही शिवसेनेला पाठिंबा देऊ शकतो ! यावर चर्चा चाललेली असताना हुसेन दलवाई म्हणाले की शिवसेना हा भाजपासारखा कम्युनल म्हणजे भेदभाववादी पक्ष नाहीय ! यावर माईणकरांनी त्यांना विचारले की बाबरी जर माझ्या शिवसैनिकांनी पाडली असेल तर मला त्याचा अभिमान आहे, हे बाळासाहेबांचे वाक्य विसरलात काय ? यावर सगळे हसले ! -- सारांश, जगण्यात भेदभाव असणारच पण राजकारणात तो नसावा -- हे तत्त्व सर्वांना मान्य आहे ! संधी आल्यास गांधीवाद आणि हिंदुत्ववाद यांचे फ्यूजन करून एक मस्त आयटेम साँग सादर होऊ शकते ! आपण जनतेतले साधेभोळे विचारवंत योग्यायोग्यतेचा प्रामाणिक विचार करत बसतो !

या विषयाच्या अनेक बाजू, विचार आणि तज्ञांची निरूपणे इथे आलेली आहेत. ते सर्व वाचून ज्यानेत्याने सध्या आपापले मत बनवावे.

आपण स्वतः स्वतःला नाही समजत -- व्यक्तिगत असे अन्वय लावत बसलो आपण तर कुठलाच माणूस ' खरा ' नाही वाटणार ! आणि कोणताही नमूना परिपूर्ण नसतो, मग, आहे त्यात काय, असा एक भाग असतोच जगण्यात -- लेखनात मला परिपूर्णतेचा ध्यास असतो -- जे परिपूर्ण असूच नाही शकत तिथे तो ध्यास काय कामाचा ? अशा ठिकाणी मी फिक्स्ड

मतेही बाळगत नाही आणि संगतवार राहण्याचीही काळजी करत नाही. असल्या प्रश्नांत कुणीही संगतवार असूच नाही शकत.

तर असो -- या निमित्ताने अनेक तांत्रिक बाबी पुढे आल्या, या प्रश्नाचे बरेच कंगोरे स्पष्ट झाले आणि मतमतांतरेही व्यक्त झाली. आता ज्याचे तो घेईल समजून. एखादे मत बनवून ते कुणाच्या गळी उतरवणे हा हेतूच नाही. हे सर्व वाचूनही शेवटी ' खरे ' मत बनवता येईलच असे नाही. असंख्य प्रश्नांबाबत भारतीय जनता सामान्य ज्ञान आणि आंतरिक शहाणपण यांवर आधारित निर्णय घेते. हे चुकीचे आहे असे कुणीच म्हणू शकणार नाही. कारण लोकशाहीत सामान्य माणसाचे ते आकलन खूप महत्त्वाचे असते. अनेक सिद्ध न झालेल्या गोष्टींवरही तो याच पद्धतीने प्रतिक्रिया देतो. जय हिंद !

' उथळ आणि सखोल ' असा काही भेद नसतोच हे उत्तर आधुनिक ज्ञान त्यांना जगता जगताच होत असावे !

Rajendra Mantri's photo.
उपोद्घात म्हणजे आरंभ, प्रस्तावना -- तुम्हाला तेच म्हणायचे आहे का ? नाही तर उपसंहार बघा पटतेय का --

Champra Deshpande commented on Swati Dharmadhikari's post.

Vasudev Ala - Modern Music - New Marathi Song - Salil Hangekar - Sumeet Music
youtube.com
ऐकले ! वेगळाच छान प्रकार आहे ! गीताबद्दल तुमचे आणि संगीताबद्दल उदयनचे खास अभिनंदन ! उदयनची अधिकाधिक प्रगती होत राहो, हीच सदिच्छा !

कोणत्याही माणसाने कोणत्याही माणसाचे रक्त शोषू नये असे एक सुभाषितच लावायला हवे चौकाचौकात !

ज्या कॉलेजात तुमचे आणि माझे जाणेयेणे झाले ते अर्धवट नका सोडू -- होऊ द्या पूर्ण --

' घर अमुचे आकाश ' -- आकाश हेच आमचे घर आणि घर हेच आमचे आकाश !

माझ्या आठवणीप्रमाणे ' जेव्हा गुरुदत्त मेलेला आढळतो ' ही दि पु चित्रे यांची एक कविताही आहे यावर.

Champra Deshpande काका खूप छान आणि संयतपणे आपले म्हणणे ठामपणे कसे मांडावे याची शालीन कुलीन शैली म्हणजे आपली उत्तरे असतात. खरोखर विद्वत्ता किती शीतल असते पूर्ण भरलेला घडा आवाज करीत नाही रिकामी भांडी फारच आवाज करतात याचा प्रत्यय आपल्या पोस्टवरील प्रश्नोत्तर रुपात घ्यायला मिळतो. खूप शिकण्यासारखे आहे आपणाकडून

'वाटा आणि वळणे'
'लांबलचक मोहून टाकणारा रस्ता जणू निसर्ग कवेत घेणार'
मी इस्माईलचा आर्टसवाला. सगळेच टॉप लोक होते आम्हाला शिकवायला !

Champra Deshpande commented on Abhiram Bhadkamkar's photo.

'काकडे काकांची एक्झीट... मोठं काम... मोठा रंगकर्मी... अलविदा काका...'
प्रचंड काम !

Champra Deshpande commented on Girish Patke's post.

स्मृतीस सादर नमन ! मीही एक पोस्ट दिली आहे.

धन्यवाद ! -- नारळीकरांची प्रस्तावना वाचली. या चर्चेत असाही एक प्रश्न आहे की शास्त्र म्हणून सिद्ध न झालेले सगळे टाकूनच द्यायला हवे का ? काही बाबतींत अशाही गोष्टी उपयुक्त असू शकतात की नाही ?

Champra Deshpande replied to नंदिनी देशमुख's comment.

Controlled clinical trials are taken as the highest level of evidence. Ayurveda lags far behind in scientific evidence in quantity and quality of randomized controlled clinical trials (RCTs) and systematic reviews.

In assessing psychology as non-science I am not dismissing its usefulness. While I have also claimed that medicine and technology are not sciences, it would be ludicrous

of me to say that they are useless. Until we scientifically understand the material basis of the mind – the brain, its billions of neurons, and the electrochemical processes that take place among them – psychological and psychiatric therapies are our only hope of treating mental illness.

Social investigators should not be offended if they are not called "scientists." Many human endeavors are necessary and useful even though their practitioners are not labeled "scientists."

तुम्ही म्हणता तशी एकमुखी मान्यता या गोष्टींना असल्याचे दिसत नाही --

आयुर्वेदाबबतही अनेक वाद आहेत -- नेटवर तुम्हाला ते वाचायला मिळू शकतात --

Economics is generally regarded as a social science, although some critics of the field argue that economics falls short of the definition of a science for a number of reasons, including a lack of testable hypotheses, lack of consensus and inherent political overtones.Jun 25, 2019

नंदिनी देशमुख mentioned you in a comment.

Champra Deshpande , हस्तसामुद्रिक , टेराकार्ड , रेकी , सुजोक , न्यूमरॉलॉजी , फेंगशुई , वास्तुशास्त्र ही सगळी छद्मविज्ञान ( pseudoscience ) या प्रकारात मोडतात . तसेच मानसशास्त्र या नावाखाली काही मंडळी ग्राफॉलॉजी ( हस्ताक्षरशास्त्र ) या विषयाच्या कार्यशाळा घेतात , त्याही वैज्ञानिक दृष्टिकोन अनुसरत नाहीत , त्यामुळे विश्वासार्ह नाहीत . बाय द वे , माझ्या आजोबांच्या पुस्तकांमध्ये एक हस्तसामुद्रिक विषयाचंही पुस्तक होतं . संख्याशास्त्राचा त्यात उपयोग केलेला असतो पण तोही शास्त्रीय उपयोजन या प्रकारचा नसतोच !

Acupuncture is a pseudoscience because the theories and practices of TCM are not based on scientific knowledge. ... A systematic review conducted by medical scientists at

the Universities of Exeter and Plymouth found little evidence of acupuncture's effectiveness in treating pain.

Champra Deshpande replied to नंदिनी देशमुख's comment.

मानसशास्त्राबाबत अनेक दृष्टिकोन आहेत -- फक्त शास्त्र हा एकच नाही, असे म्हणणारेही आहेत -- इथल्या इथे आपण एकमेकांत परिवर्तन करायची गरज नाही -- निरनिराळे मुद्दे समोर आले की ज्याचे त्याने समजून घ्यायचे -- तुम्ही म्हणता ती मान्यता कधी मिळाली ? कालांतरानेच ना ? आणि मान्यता मिळेपर्यंत ते सगळे ' असत्य ' होते का ? असो. आपले ' पाहणे ' वेगवेगळे आहे. शास्त्र म्हणून मान्यता न मिळालेले सगळे नाकारलेच पाहिजे, असे माझे पाहणे नाही.

Champra Deshpande , या तुम्ही उल्लेखलेल्या चारही आणि योगशास्त्रालाही वैज्ञानिक दृष्टिकोनातून मान्यता मिळाली आहे .

अर्थशास्त्र, मानसशास्त्र, ऍक्युपंक्चर, आयुर्वेद अशा अनेक गोष्टी शास्त्र या संज्ञेला पात्र आहेत का याच्या चर्चा चालूच असतात --

कुंडली शास्त्राचे मला काही माहीत नाही पण हस्तरेषा शास्त्रात खूपच तथ्य आहे हे मी पाहिलेले आहे. तरीही हे कुणी कुणाच्या गळी उतरवण्याचे विषय नाहीत -- तुम्ही योग्य तेच केलेत असे मी म्हणेन --

Padmanabh Pathak तुला उत्सुकता असेल तर कोणत्याही पुस्तकापासून सुरुवात कर -- मी श्री. ऋषी यांच्या एका छोट्या पुस्तकापासून सुरुवात केली होती -- आधीच धोक्याची सूचना देऊन ठेवतो -- हे एकच प्याल्याहून वाईट आहे --

( आणि तुमच्या विचारार्थ एक वेगळाच प्रश्न उपस्थित करून ठेवतो -- भूमिकेबद्दल अनेकदा बोलले जाते -- भूमिका म्हणजे पवित्रा नसते ? पण, यावर नंतर बोलू -- आधी, माझ्यावर बोलण्यापेक्षा चाललेल्या विषयावर तुम्ही बोलू शकलात तर त्याचा चर्चेला उपयोग होईल -- )

तुम्ही विषयावर का नाही बोलत ? बुद्धिप्रामाण्यवादात मनाची सर्व वैशिष्ट्ये गृहीत नाही धरत ? सगळे संघर्ष, युद्धे, फाटाफूट ही कशामुळे असते ? तुम्ही बुद्धिप्रामाण्यवादाचे तज्ञ आहात तर त्यावर बोलायचे का टाळता ? मला काही कळत असो की नसो, मी जे म्हटलेय ते चुकीचे का आहे याबाबतचे तुमचे आकलन मांडा ना. तुम्ही वा कुणीही माझ्या बोलण्याला विनोदी

म्हणणे वा मी तुमच्या बोलण्याला पळपुटेपणा म्हणणे याला चर्चा नाही म्हणता येणार -- हे तरी बुद्धिप्रामाण्यवादात मान्य असावे !

Champra Deshpande केवढं मोठं sweeping statement करताहात. 'बुद्धीप्रामाण्यवादी' ही काय एक प्रजाती आहे का? तुमचं विधान धड निरीक्षणसुद्धा नसावं. ते तुमचं मतही नाही; पवित्रा आहे. असा पवित्रा व्यक्तिरेखा घडवायला, नाट्य निर्माण करायला उपयोगाचा, हे खरं; पण ते सगळ्यांनी का स्वीकारावं?

इथल्याच दोन कॉमेंट्स पहाः सुळे म्हणतात, तुमची पोस्ट विनोदी आहे. भाटलेकर म्हणतात, आशावाद हीच एक अंधश्रद्धा आहे. या दोन कॉमेंटींसोबत तुमचं विधान ठेवा.

हे सत्य नाही ? का ? मी सविस्तर बोललोय -- तुम्ही उडत उडत नुसते माझ्यावर शेरा नका मारू -- विषयावर बोला --

सगळे सोडून नशीबवादी बनूच नये पण याचा अर्थ काही उपयोगांकडेही दुर्लक्ष करावे, असे नाही. पण, असो -- तुमचे पक्के ठरलेले विचार आहेत तर चलने दो --

Prabhakar Bhatlekar बुद्धिप्रामाण्यवादाची श्रद्धा सगळ्यात भारी असते -- महत्त्वाकांक्षा, वर्चस्वाची इच्छा, सततची सुखेच्छा, मान, अपमान, सूड, प्रतिष्ठा वगैरे सगळे असणारच मानवी जगण्यात असे म्हणत ते इथे स्वर्ग अवतरेल अशी श्रद्धा बाळगतात !

हस्तरेषा हा प्रांत मी बंद करून काही वर्षे झाली -- पण त्याव्यतिरिक्तही सहज गप्पांसाठी कधीही भेटू --

मन्या ओक आणि षांताराम पवार यांनी तो प्रयोग माझ्यावरही केला होता -- त्यांची ती पद्धत माझ्या डोक्याने मी शिकून घेतली आणि अनेकदा वापरली !

मेडिकल पामिस्ट्री ही एक स्वतंत्र शाखाच आहे -- व्यवसाय मार्गदर्शनावरही बरेच संशोधन झालेले आहे --

नाही -- बंदच केले -- त्यात सतत बुडलेले असल्याशिवाय ते नीट अवगत होत नाही -- हा एक समुद्र आहे एवढे कळले --

या विद्येबाबत असे वाद अनेक वर्षे आहेत -- त्याचे काही उपयोग, फायदे आहेत का हेही पाहण्यात काहींना इंटरेस्ट असते --

असे काही हुशार मित्रांना वाटणार याची कल्पना आहे.

गाफर, श्रीमाली, कीरो, सेंट जर्मेन -- ही वाच मग इतर सांगेन.

सावध करणे, करियर सल्ला, तब्येतीचे नाना प्रश्न यांवर उपयोग होऊ शकतो -- घडणारे टळू शकते का ते मला माहीत नाही --

Prakash Bal Joshi mentioned you in a comment.

'It was great pleasure to present my book of short stories "Mirror in the Hall " published by Ratna Books New Delhi to director of Omani Society for Fine Art Maryam Al Zadjali'

Champra धन्यवाद

Champra Deshpande commented on Prakash Bal Joshi's photo.

अभिनंदन !

ते बौद्धिक वा पुस्तकी नाही -- मेलडी खाओ और खुद जान जाओ -- असे आहे --

माफ करा, या अशा दांभिकतेबद्दल बरेच बोलले गेलेले आहे -- ते कवितेत येण्याची एक गंमत ठीक आहे.

बुद्धीने ' अचूक ज्ञान ' होते या कल्पनेतला फोलपणाही या सटरफटरपणात येतो --
तसा काही हेतू नाही -- एकूण वैचारिकतेवर हे एक भाष्य आहे, इतकेच --

भूमिका हा एक वैचारिक साचा असतो -- समस्येचे भान घेणे हा वैचारिक साचा नसतो -- त्यामुळे, ती भूमिका नसते --

एखादे असत्य दिसते -- त्याबद्दल शंका उपस्थित होते -- ती शंकाही असत्यच असते असे म्हणत आपले ते चालू ठेवता येतेच --

अन्नू मलिक या संगीतकाराची एक मुलाखत पाहिली होती टीव्हीवर. त्याला विचारले होते की आता पूर्वीसारखी मेलडी का नसते गाण्यांत ? तो म्हणाला की सहा सहा महिने वा वर्ष वर्ष प्रेम घोळवत ठेवून मग जवळ यायला आता वेळ कुणाला आहे ? कशी असणार मेलडी ?

आता डायरेक्टच " आती क्या खंडाला " !

Champra Deshpande commented on Satish Tambe's post.

धार्मिकताच असे नव्हे, भेदाची पेरणी करून अमानुषतेची पैदास करणे हा माणसाच्या मनाचाच गुण आहे. धर्म, विचारसरणी, घराणे, प्रांत, भाषा, जात, देश, आस्तिक-नास्तिक, श्रद्धावाद-बुद्धिप्रामाण्यवाद, इहवाद-परलोकवाद -- अशी शेकडो निमित्ते असू शकतात. यांतल्या कोणत्याही बाबीशी समरूप झालेला माणूस जरूर वाटेल तेव्हा अगदी ' नैतिकतेने ' अमानुष होऊ शकतो. हे सगळे वैचारिक आणि उथळच असते. यात सखोल समजबिमज काही नसते. माझ्या टोळीकडे अमर्याद सत्ता आली की मी सर्वांच्या हितासाठी अमानुष व्हायला मोकळा असतो. सत्ता प्राप्त न झालेले किंवा प्राप्त होण्याची शक्यता नसलेले मात्र अहिंसकपणे माणुसकीचे कढ आणत राहतात. मुख्य गोम माणसाच्या मनातच आहे.

हे तर रत्नाप्पाण्णाजी कुंभारसाहेब झाले !

१ मला कोणताही पक्ष विचारत नाही.
२ माझ्याकडे पैसा खूप आहे.
३ जनतेची सेवा करायचीच हे माझे पक्के ठरलेले आहे.

प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारावर लिहिलेला चांगला लेख !

अरे वा ! प्रकाश तिकडे कुठे गेला ?

हार मानायची नाही -- राजकीय पुढाऱ्याप्रमाणे, दुसरेच काही लिहायचे --

September 2019

September 30

उत्तमच ! तुमचा संगीतकाळ माझ्या आधी सुरु होतो ! माझा सुमारे ५५-६० पासून !

मुंबईचे भयानक गंध-दर्शन ! मानवी जगण्याच्या विदारक अवस्थेचा करकरीत कुरूप काप !

मी कविता समजावून देत नाही -- उत्सुकता असेल तर अनेकदा वाचा -- समजत जाईल --

या अशा सर्व पोस्टींमधली मानसिक भेसळ सर्व कट्टर मानसिकतावाल्यांना सतत एक मस्त आव्हान निर्माण करणारी आहे, हे मला खूप आवडते !

अत्यंत आत्मीयतेने कविता वाचून त्यांवरचे खुले चिंतन छान मांडले आहे !

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष साहित्यावर काही बोलणारच नसेल तर -- अशा सर्व प्रश्नांना ' चालेल ' हेच उत्तर असेल, असे दिसते आहे.

मराठीचे पी एच डी अगणित असतील पण समीक्षक उपलब्ध नाहीत ! संमेलनाला अध्यक्ष मिळताहेत ना, मग बास !

मीही असाच नोकरीनिमित्त बाहेरगावी होतो -- आणि मुळात साहित्य संमेलन ही माझ्या इंटरेस्टची बाबच नाही --

तुमच्या विचारांशी असहमत --

किंवा सतत दुःखाने तरी -- बुद्ध बोले ना का दुःखमुक्तीचे !

काल सूनबाईंनी जिने उतरून जाऊन हॉटेलातून आणले -- आता प्रश्न नाही --

माझ्या मते साहित्य संमेलन हे कविता, कथा, कादंबरी, चरित्र, प्रवासवर्णन, ललित निबंध, साहित्य-समीक्षा यांचेच असायला हवे. पर्यावरण, मानसशास्त्र अशा इतर विषयांची स्वतंत्र संमेलने होत असतात.

मी त्यांचे म्हणजे दिब्रिटोंचे काहीच वाचलेले नाही --

अरे, समज, ते वैज्ञानिक दृष्टिकोण नसले मानत तर ते घटनेच्या विरोधात जाईल का, अशी काळजी वाटते, इतकेच --

मीही सरांचा एक आवडता विद्यार्थी होतो. इस्माईल युसुफ कॉलेज. सरांच्या स्मृतीस अभिवादन !

A precondition for reading good books is not reading bad ones: for life is short."
— Arthur Schopenhauer, Essays and Aphorism

एकटेपणाच -- ट्रॅफिक जॅम --

जरूर ! लिखना तो चाहिये ! यापूर्वी मी ' एकटेपणाचा शौक ' या नावाचा एक लेख लिहिला होता -- तो काय होता, हे पाहावे लागेल --

आपले प्रश्न ' पाहणे ' ही समजून घेण्याची प्रक्रिया --

अर्क कविता !

व्यक्तिगत प्रतिक्रिया नसणे -- व्यापकता असणे म्हणजे निरागसता -- असे मी पाहतो -- निरागसता म्हणजे भाबडेपणा वा मद्दडपणा नव्हे --

सुईत दोरा ओवण्यसाठी हल्ली तारेचा एक प्रकार मिळतो -- अजिबात वेळ जात नाही -- तुला माहीत असेलच --

T. S. Eliot once said that "good writers borrow, great writers steal."

खरे तर निवृत्तांच्या चेहऱ्यांवर थोडे स्मित आणावे, हाच हेतू होता --

Ramesh Zawar mentioned you in a comment.

Champra Deshpande ही सूचना तांत्रिक आहे. व्यापक धोरण म्हणजे 'नेमाडपंथा'प्रमाणे चंप्रपंथ!

Champralekhan

champralekhan.com

हे घे --

नूतनीकरणापूर्वीच्या वेबसाईटवरचा प्रारंभ मजकूर

प्रारंभ

(होमपेज)

माणसाच्या प्रश्नांची विभागणी व्यवस्थेचे प्रश्न आणि मनाचे प्रश्न अशी करता येते. काहीजण असे मानतात की व्यवस्थेचे प्रश्नच अधिक महत्त्वाचे असतात आणि मनाच्या प्रश्नांची निर्मितीही व्यवस्थेच्या प्रश्नांतूनच होते. याउलट, काहींच्या मते मुळात सगळे मनाचेच प्रश्न असतात आणि व्यवस्थेच्या प्रश्नांच्या विकृतीही मनाच्या प्रश्नांतूनच तयार होतात. सामान्यत: सामाजिक, आर्थिक, राजकीय परिवर्तनासाठी चालणाऱ्या विवेकी कृती, चळवळी या प्रचाराच्या, प्रबोधनाच्या, आंदोलनाच्या आणि क्रांतीच्या कृती असतात. मनाच्या प्रश्नांच्या क्षेत्रातल्या समजुतदार कृती या प्रामुख्याने सांस्कृतिक कृती असतात. यात अर्थात थोडीफार सरमिसळ होऊ शकते. परिवर्तनाच्या क्षेत्रातल्या कृतींना विचारसरणी, बांधिलकी यांची गरज असते. याउलट, मनाच्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांचा काडीमात्र उपयोग नसल्याचे दिसते. कोणतीही विचारसरणी, कोणताही धर्म वगैरे बाळगणाऱ्या आणि कोणत्याही व्यवस्थेतल्या लोकांचे मानसिक प्रश्न समान असतात. म्हणजे, याचा अर्थ, मनाचे पाताळयंत्रच निकडीने पाहायला हवे.

Home Page

Human problems can be divided into the problems of system and the psychological problems. Some people believe that the problems of system only are important and the psychological problems are just their by-products. As against this, some people believe

that essentially all are the psychological problems only and the problematic aberrations in system are just their outward expressions. Generally, all rational activities, movements intended to bring about reformation in social, economic and political structures are actions of propaganda, enlightenment, agitation or revolution. The wise actions in the field of the psychological problems are mainly cultural in nature. Some mixture of the both is, of course, possible. The activities for reformation need ideology and commitment, but, they are found to be totally useless in the field of psychological problems. People belonging to any ideology, any religion and placed in any type of system have the same psychological problems. That means, the intricacies of the psychological structure only need urgent attention.

--- ००० ---

नवीन मजकूर

होम पेज ( प्रारंभ )

लेखक म्हणून तुम्ही ' भूमिका ' असण्याचे महत्त्व मानता का, सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तनासाठी तुम्ही लिहिता का, ' विवेक ' हेच अंतिम मानवी मूल्य आहे असे तुम्हाला वाटते का आणि बुद्धिप्रामाण्यवाद हेच सर्वोच्च श्रेयस आहे, असे तुम्हाला वाटते का –

-- या सर्व प्रश्नांना माझे एकच उत्तर नाही असे आहे.

त्याचप्रमाणे,

आहे ते, आहे असेच चालू राहावे, असे तुमचे मत आहे का ?

याही प्रश्नाला माझे उत्तर नाही असेच आहे.

मानवी जगण्याचे प्रवाही, कृतिशील भान भाषेत व्यक्त होणे म्हणजे सर्जक लेखन.

Home Page

As a writer do you have any ideology, do you write for social-political-economic reformation, do you consider that conscience is the main value and do you claim that thinking is the only way of understanding –

-- I have to reply NO to all these questions.

Similarly , to the question --

Are you a supporter of status quo ?

I have to say NO to this also.

The expression of the stream of active awareness of human living is creative writing.

--- 000 ---

कलेतली सर्जकता कोणत्याही ऑथॉरिटीत नसते -- ती प्रत्यक्ष घडणाऱ्या आकलन-प्रक्रियेत असते --

फेमस होण्याचा नाही हो चाललेला विषय --

लाख्यांनी मांडलेला रावा कदमांच्या कवितांचा मुद्दा बरोबरच आहे. माझ्या तर शेकड्यांनी कविता आहेत. माझीही तीच आहे अवस्था. मी मराठीतला एक कवी म्हणून हयातच नाहीय. याचा एक अर्थ माझ्या कविताच तद्दन भिकार, फालतू आहेत किंवा मग मराठीतले सांस्कृतिक वातावरण तसे आहे !

श्री. विघ्ने यांनी दोन मुद्दे मांडले आहेत. त्याबाबत -- एक म्हणजे पंथनिर्मिती करण्याला माझ्या आकलनात स्थानच नाही, त्यामुळे, तसा मी निकालातच निघतो. दुसरे म्हणजे लेखकाचे नाव. लेखक वा पुस्तके यांपेक्षा लेखन-वाचन यांत घडणारी सर्जक प्रक्रियाच महत्त्वाची, हे मी म्हटलेलेच आहे.

मौल्यवान कविता ! आजच त्यांना, ' येत राहू द्यात कविता ' अशी मी विनंती केलेली आहे !

चण वा बांधा -- या शब्दांचा होईल का कुठे उपयोग ?

काही वेळी मी पूर्ण नाटकांचे पुनर्लेखन केले होते -- वेबसाईटवर घेताना अंतिम तेच घेतले -- तसे तर काहीच कधीच परिपूर्ण होत नाही -- लेखकाच्या दृष्टीने संपले की संपले ! कुणितरी म्हटलेच आहे की कविता पूर्ण कधीच होत नाही, तिचा फक्त त्याग केला जातो !

माझ्या वेबसाईटवरच्या संहिता फायनल करताना पुरेशी काळजी घेतलेली आहे. त्यामुळे, जो भी है वो ठीक है फिक्र क्यों करे --

Girish and Ravindra are celebrating 10 years of friendship on Facebook!
माझ्या नाटकांना प्रकाश दाखवणारे माझे प्रिय दिग्दर्शक ! माझ्या श्रेयस्कर स्वार्थातून दोघांनाही खूप शुभेच्छा !

प्रतिक्रियेची यंत्रणा सेम एकसारखीच असते -- त्यातली विविधता म्हणजे ' माझे क्रौर्य कसे तुझ्या क्रौर्यापेक्षा अधिक मानवी हिताचे ' अशी असते.

एकेका व्यक्तीचे मूल्यमापन करण्यात मला इंटरेस्ट नाही ( ते शक्यही नसते, असे माझे आकलन आहे. ) माणसाच्या मनाचे असणे आणि वागणे यावर ही पोस्ट आहे. स्वतः पडताळून खरेखोटे पाहावे. खोटे वाटल्यास सोडून द्यावे.

' ॲब्सर्ड ' या शब्दाचा वापर तर होणारच ना ! सगळ्यांच्या जशा प्रतिक्रिया, तसेच हेही सहानुभूतीने घ्यावे ! मै भी तो सहानुभूतीका थोडासा हकदार हूँ !

Ravindra and Girish are celebrating 10 years of friendship on Facebook!
दोघांनाही खूप खूप शुभेच्छा !

Champra Deshpande commented on his own post.

माझे आजोबा शिक्षक होते. त्यांनी दोनतीन नाटकेही लिहिली होती, असे माझी आजी सांगे. कोणत्याही महत्त्वाच्या सभासमारंभांत भाषणे द्यायला त्यांना हमखास निमंत्रणे असत. ते न्यूमोनियाने सुमारे पस्तीसलाच गेले. ते एल एल बी ला बसले होते. पास झाल्याचा निकाल घरी तारेने कळवला जाई. दारात ते पास झाल्याची तार घेऊन पोस्टमन उभा असताना इकडे घरात त्यांनी प्राण सोडला होता ! असे ते अत्यंत नाट्यमय पद्धतीने वारले होते !

वालावलकरांची ' बाकी शून्य ' ही मला महत्त्वाची वाटली होती. तिचे तर नामोनिशाणही कुठे दिसत नाही. असे का झाले असावे ?

' संकटी ' की ' संकष्टी ' हे आधी नक्की करायला हवे -- आणि ते ' सरळ सोंड ' नसून ' सळळ सोंड ' आहे असे वाचनात आले होते कारण हत्ती जिवंत असताना सोंड सळसळतीच असते, सरळ कधी नसते -- असे ते म्हणणे होते ! खरेखोटे देव जाणे !

August 2019

August 31

मला ते शास्त्र फारसे समजत नाही, म्हणून एक शंका -- सर्वांची काटकसर वाढत गेली तर मागणी घटत जाईल आणि त्याने मंदीची तीव्रता अधिकच वाढेल -- असे होऊ शकते का ?

स्मृतिप्रधान जगण्याची विदारक कविता !

तेंडुलकरांच्या एका नाटकातून डालडाचा डबा प्रथन रंगभूमीवर आला, असे वाचले होते.

किंवा ' निरक्षरांना प्रवेश नाही ' असा बोर्ड लावणे

कोमेजणे, सुकून जाणे, निस्तेज बनणे वा फिकट होणे -- यांतले अर्थ नको होते --

या प्रश्नाचे उत्तर ' नाही ' असे दिले जाऊ शकत नाही जसे ' तुला झोप लागलीय का ? ' याचे उत्तर ' होय ' असे दिले जाऊ शकत नाही.

सामान्यतः सूर्यापासून कुंतीला मुलगा होण्याची पद्धत आहे !

मला खरेच असा प्रश्न पडतो की खरेच अशा प्रकारांनी मानसिक विरेचन होते का ? द्वेष, क्रोध नष्ट होतात का ? की थोडेफार ' बरे ' वाटण्यासाठी असाव्यात अशा प्रथा ?

इथलीच काय जगातलीही हिंसा वाढत चालली आहे, असे म्हणणारेही लोक आहेत. त्याचे मोजमाप कसे करणार ?

डावा मेंदू तर्कवाला ( उजवे लोक ) आणि उजवा मेंदू ( डावे लोक ) सर्जकतेचा !

कोणताही लेखक लिहितो ते त्याच्या अनुभवावर आधारित, त्याच्या व्यक्तिमत्वाच्या माध्यमातूनच लिहितो -- म्हणजेच परिस्थिती वेगवेगळीच असते. त्याच्या अस्मिता तयार करायचे काही कारण नाही. इथे ' गरजे ' चा काय प्रश्न येतो ? ' त्यांचे ' वाचल्यामुळे नासाडी कशी होते ? तुकारामातही बरेच दुर्बोध अभंग आहेत. त्याचा परिस्थितीशी काय संबंध ? नुसते ढोबळ, निवेदनात्मक, ' समजणारे ' लेखन एवढेच नसते साहित्य. नेमाडे साहित्याच्या कल्पना फार संकुचितपणे मांडताहेत.

Champra Deshpande replied to Ravindra Pandhare's comment.

मुळात तिकडचे-इकडचे, गरज असणे-नसणे, दुर्बोधता म्हणजे दोष समजणे आणि ' कळणे ' हेच जणू मूल्य समजणे -- हे सगळेच विवेचन संकुचित आहे. इतक्या विद्वान व्यक्तीने असले विचार मांडावे हे वाईट आहे. असल्या विचारांमुळेच त्यांना बेकेट आणि टी एस एलियट हे दुय्यम लेखक वाटतात. सर्व मौल्यवान कलाकृती या पूर्ण मानवजातीसाठी असतात. अन्यथा, नुसत्या अनुभवाच्या स्तरावर तुमच्या-माझ्या मनांच्या अवस्थाही वेगवेगळ्या असतात. आपल्या कलाकृतींची तरी मग आपल्याला एकमेकांना गरज काय ?

" समाजात नीतिमूल्यं आपोआपच झिरपत आलेली असतात " -- असे ते याच मुलाखतीत म्हणतात. म्हणजे ते समाजमान्य नीतिमत्तेचा पुरस्कार करताहेत, असे दिसते.

पण प्रश्न सुटलाय कुठे ? पाकव्याप्त काश्मीरचा आहेच ना प्रश्न !

मनोहर ओकच्या एका कवितेतली ' हे प्रियतम माझे अंधार ' ही ओळ लक्षात राहिली आहे.

मन नावाचा अवयव दाखवता येतो का ते नाही माहीत पण मानसशास्त्र नावाचे एक शास्त्र मात्र आहे ! आणि ते बुद्धिप्रामाण्यवादीच आहे !

कारण-परिणाम ही साखळी न मानता बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे काय, ते सांगता यायला हवे.

आपण ज्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, वगैरे कारणे म्हणतो तीही मानवी मनांचीच निर्मिती असते ! सर्वांच्या आंतरिक प्रक्रियांनीच बाह्य परिस्थिती तयार होते. ती कुणा देवाची निर्मिती नसते.

ते बदलही कार्यकारण बद्धच असणार ना ? की आकाशवाणीसारखा तो चमत्कार असेल असे तुम्ही मानता ?

वेगळे काय सापडले, निराशावाद कसा रद्द ठरला ते प्लीज थोडक्यात सांगा. एकदा कारण-परिणाम ही साखळी मानायची आणि ती झुगारूनही द्यायची, हे कसे घडले ? समजून घेणे इंटरेस्टिंग होईल !

बनणे वैचारिकच असणार !

हे ठीक ! ' असभ्यपणा चालेल ' असे कुणीच नाही म्हणणार ! ते असो. पार्ल्याला एका रात्री तू, सचिन खेडेकर, गिरीश पतके आणि मी भेटलो होतो, त्याची आठवण झाली ! तेव्हा आपण गालिबबद्दल बोललो होतो !

July 31

हिंदी, मराठी सिनेमा असो की नाटक, समोर चाललेल्या कलेचा लोक अनेक प्रकारे बिनदिक्कत अपमान करत असतात. वर दिलेल्या एका उदाहरणाप्रमाणे, व्यावसायिकवाल्यांना वा प्रायोगिकवाल्यांना, निरनिराळ्या कारणांनी, व्यत्यय वा आक्रमणे सहन करावी लागतात, हे खरेच आहे. याचा अर्थ, कुणी त्याची समर्थने करेल वा करत असेल असे मला वाटत नाही. आपले लक्ष आपल्या कलेवरून ढळू नये, असेच कोणत्याही प्रामाणिक कलाकाराला वाटणार. तसेच, प्रत्येक कलाकृतीबद्दल प्रत्येक प्रेक्षकाला वाटेलच असे नाही. तरीही, सभ्यपणाच्या काही मर्यादा लागतीलच. मोबाईलबाबत काही कडक नियम करून त्यावर मार्ग काढता येईल. पण, झोप काढणे, कायप्पा पाहात बसणे वा तत्सम इतर कलेचे अपमान चालूच राहतील. जे थांबवणे शक्य आहे ते जरूर थांबवावे. पण, या निमित्ताने, कदाचित रागाच्या भरात, किशोरने जी प्रायोगिकची हेटाळणी केली आहे, तसेही घडू नये. परवा, ' माझा कट्टा ' वर किशोरने, तो १५ वर्षे दुबेजींबरोबर होता हे सांगून त्यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. ते अर्थातच छान वाटले. आपण सगळेच थियेटरवाले, प्रेक्षकांनी समोरच्या कलेबद्दल काही सभ्यता पाळणे आवश्यक आहे, ही जाणीव प्रेक्षकांत निर्माण करण्यात कमी पडतोय का, हाही विचार केला पाहिजे. बाकी आपापल्या कुवतीप्रमाणे आपण काम करत राहणारच आहोत. सर्वांना मैत्रीयुक्त शुभेच्छा !

मी सहिष्णुपणे घेत नाही, असे तुमचे मत असूनही तुम्ही इथे कशासाठी लिहिता ? तुमची मते तुमच्या वॉलवर मांडत जा. तुमची मते मला फारशी विचारार्ह वाटत नाहीत. आपल्यांत चर्चा होऊ शकत नाही. तरी, यापुढे इथल्या चर्चेत भाग घेऊ नये ही नम्र विनंती. एकमेकांचे वाचण्यापुरती मैत्री ठेवू. मी काय प्रमोट करतो वगैरे रद्दड भाषा मला इथे चालणार नाही.

July 2019

July 31

परवाच टीव्हीवरून एका होमियोपाथिक डॉक्टर बाईनी हेही सांगितलेय की बटाटेवडा पौष्टिक असतो !

कलाकृती म्हणून गांभीर्याने काही पाहायचे असते, असे वातावरणच कुठे आहे ? कलेतल्या चिंतनात्मकतेला कोण पुसतो ? लेखक, कलाकार आणि प्रेक्षक या सर्वांनी मिळून तयार केलेला हा उथळपणा आहे.

Rangasanwad | Champra Deshpande | Interviewed by Abhiram Bhadkamkar
youtube.com
१. निरनिराळ्या नथिंगनेसांची तुलना मला नाही करता येणार.
२. निरर्थकता या विषयावर काल्पनिक वा बौद्धिक चर्चाच मुळात निरर्थक आहे. उपाय एकच -- मेलडी खाओ और खुद जान जाओ !

माझे ७४ चालू आहे -- या सगळ्यांच्या पुढे आहे मी --

धाय म्हणजे हृदय आणि मोकलून म्हणजे मोकळे सोडून --

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

अनिलच्या निधनानंतर त्याच्या तीन कविता मी इथे दिल्या होत्या -- त्या पुन्हा देत आहे --

१.
चौकाचौकात लावलेली पत्रके वाचून
आपण घरी परतलो.

रात्र झाल्यावर
आपण झोपी गेलो.

मध्यरात्री शहरात
बरीच पळापळ झाली.
नंतर मी जागाच राहिलो
तू उठली नाहीस.

सकाळी मी तुला हे बोललो.
पाखरू उडून गेलेल्या फांदीसारखी
तू दिसत होतीस.

कुंडीतली वाळून गेलेली
वेल उपटून तू म्हणालीसः
संध्याकाळी नवी पत्रके वाचायला
जायला हवे.

२.
किती साहशील आता चंद्रऋतूंची ही गाणी
गात्रांतून रिचवू दे तव देहाची वारुणी

फुलातून गर्भारल्या सोनलाटा अनिवार
कसा सोसवेना तुला माझ्या नजरेचा भार

गूढ रानातून पळे जागलेला वात मंद
पान पान ग हलले सोड अंगांगाचे बंध

अंधाराच्या गालावर आज तारकांची तीट

रात पिऊन जराशी हो ग राणी आता धीट

३.

कितीक नावे खोदित गेलो तरी हरवली नाती
प्राक्तनातुनी माझ्या गळते अंधाराची माती

ताल विसरल्या गाण्यांचाही केला मी प्रतिपाळ
आकाशाने वाजविले मग भग्न दिशांचे टाळ

स्वप्ने माझी शिशिरफुलांची रात्रीच्या गर्भात
कपाळावरी त्यांच्या लिहिली कुणी विषारी जात

वेदीवरती नकारांचिया कुणी सांडले रक्त
दिवाभितांच्या वस्तीवरती रातकिड्यांची गस्त

--- ००० ---

गृहीत धरायचे कशाला ? बीजेपी आणि शिवसेना दोघेही हिंदुत्ववादी असल्याचे ते उघडच घोषित करत असतात.

७६ ते ७९ कोल्हापुरात होतो --

अनिल आमच्या कोल्हपूर ग्रुपमधला एक अबोल !

अलिकडे बऱ्याच कविता लिहून झाल्या. काही लेख लिहिले.

काँग्रेस देशविरोधी आहे, असे सूचित होतेय ? पोस्ट नीट वाचली असती तर अशा पूर्वग्रहाने बोलले गेले नसते.

मर्जीने म्हणजे तिकडचा रिच चारा पाहूनच ना ?

कल्पनाशक्ती इतक्या उन्मुक्त अवस्थेची असणे ही अति-विरळा बाब आहे ! अति-सूक्ष्म आणि अवाढव्य जाणिवांचे भांडार नजरेसमोर असल्याशिवाय हे शक्य नाही ! तिळवे भांडार !

काही इमारती कशा धोक्याच्या म्हणून जाहीर होतात तशीच पृथ्वी लौकरच धोक्याची म्हणून जाहीर होईल !

पुतळ्यांचा मुख्य उपयोग म्हणजे त्यांची विटंबना झाली की दंगल भडकवता येते, हाच ! दुसरा उपयोग हा कावळ्यांसाठी असतो !

राजन अपरंपार's photo.
( गिरीश साळवी ) खरोखरच अत्युत्तम अभिनेता ! माझ्या दोन नाटकांत त्याने कामे केली. गिरीश पतकेने बसवलेले त्याचे एकपात्री ' चौऱ्याहत्तर -- ' हा एक मास्टरपीसच होता !

प्रकाशने काही भागांचे दिग्दर्शन केले असावे. एकदा, एका रात्री, प्रकाशच्या त्या हेरिटेज मोटरसायकलवर, प्रकाश, मंगेश आणि मी असे ट्रिपल सीट दादरहून चेंबूरला मंगेशच्या घरी गेलो होतो. मी विचारले होते की पोलीस पकडणार नाहीत ? -- तर प्रकाश म्हणाला होता की ' एक शून्य शून्य ' मुळे त्याला सगळे पोलीस ओळखतात ! ( की दुसऱ्या कोणत्या कार्यक्रमामुळे, आठवत नाही -- )

मोर्चाच सत्ताधाऱ्यांचा असल्यावर, समजा लाठीमार करायची वेळ आली तर ते स्वतःच स्वतःला कसे मारून घेतील ?

Vidyadhar Joshi's photo.
" लब्बाड ! माझा खंबा पळवलास ना ? ! "

त्यात एक करता येईल -- त्यांतल्या एका कलाकाराला कसले तरी बक्षीस जाहीर झाल्याची बातमी येते -- मग, बाकीचे, तो कसा खरे तर किरकोळ कलाकार आहे आणि फील्डिंग लावण्यात कसा माहीर आहे, अशी चर्चा सुरू करतील -- त्यातून गट पडून भांडणे सुरू होतील -- मारामारीपर्यंत येईल --

' संत ' हा दूरस्थ वाटणारा शब्दच कशाला हवाय -- आत्ता आपण अमानुष आहोत ते मानुष होऊ, असे म्हणू या --

विवक्षिततेच्या आणि स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून पूर्ण मानवजातीला प्रस्तुत ठरणे, अशा व्यापक अर्थाने ' मिथक '. म्हणूनच ' सिक्स कॅरॅक्टर्स -- ' वा ' वेटिंग फॉर गोदो ' हीही आता मिथके ठरतात. -- या अर्थाने पाहावे.

पोस्टबद्दल, अर्थातच, धन्यवाद !

माझ्या संकेतस्थळावरच्या माझ्या एका कवितासंग्रहाचे नावच ' रिकामीक ' आहे -- अर्थात मित्रवर्य तुकारामाच्या सौजन्याने !

माझा मुलगा त्या वेळी तिसरी-चौथीत होता -- त्यांच्या शाळेच्या स्नेहसंमेलनात सादर करण्यसाठी मी त्याच्याकडून ' स्कायलॅब ' हा एक छोटासा एकपात्री कार्यक्रम बसवून घेतला होता !

लोक हल्ली तब्येतीबद्दल जागरूक झालेत -- फार साखर खात नाहीत --

Champra Deshpande commented on Swapnil Chavhan's post.

ओसंडून जबरदस्त कविता ! शेयर करतोय --

Rangasanwad | Champra Deshpande | Interviewed by Abhiram Bhadkamkar

youtube.com

Champra Deshpande

एकतर्फी संवाद सुरु ठेऊ.माझे शिक्षण होते त्यात!

But two things

One on a serious note

तुमचे पोलीटीकल लीनींग मला माहीत नाही पण आताच्या बीजेपीच्या देशावर होणाऱ्या संस्कारांना मॉडरेट करण्याची,नाटकाद्वारे,तुमची जबाबदारी आहे.तुम्ही तसे आज एकटेच आहात.

On a lighter note

आपल्या या चर्चेतून मला एक नाटक सुचले! ते मी सप्टेबर मधे लिहीणार आहे.कोणी छापले तर तुम्हालाच अर्पण करीन.

Champra Deshpande हो अतिशय भेदक संवाद, संवाद लेखक कोण सापडत नाहीये. चित्रपट गौरव सोलंकी आणि अनुभव सिन्हाने लिहलाय.

आपल्यांत संवाद नाही होऊ शकत, हे मला समजलेले आहे -- तुम्हीही घ्या समजून --

तुम्ही इथे मित्रयादीत असणे हे अत्यंत मौल्यवान आहे !

वास्तवाचे घागेदोरे नसतात, असे मी कुठे म्हटले आहे ? चांगली कला वास्तवातल्या उपयोगासाठी नसते -- awareness साठी असते -- हे म्हणणे आहे -- ते न समजून घेता तुमच्या मनचे आक्षेप तुम्ही तयार करत आहात -- पण, असू द्या -- हे सगळे वाचून जो तो आपापला विचार करेल -- तुम्हाला प्रत्येक चांगली कलाकृती बोधप्रद असते, असे वाटते -- हेच ते बौद्धिक विधानात ' बसवून टाकणे ' -- असल्या दृष्टिकोणामुळे कलेचा आत्माच मारला जातो, असे मला दिसते --

परवा मालाडच्या सबवेमध्ये पाण्याचा लोंढा आला आणि एका कारमधली माणसे गुदमरून मेली ! तसे त्या बोगद्यात पाणी आले तर आख्खी गाडी राम म्हणेल !

हे तसे नव्हते -- एकाच भांड्यातले सर्वांना वाढले जात होते -- आणि मी फारसा भोळा नाही, हे माझ्या संपर्कात येणाऱ्यांना माहीत असते --

मी एका खेड्यात शाखाप्रबंधक असताना -- आम्ही कर्जाने दिलेल्या शेळ्या, गाई, म्हशी, बैल, दुकाने, वगैरे जागेवर आहेत का, याची तपासणी करायला आजूबाजूच्या खेड्यांत जावे लागे. एसटी भरवशाची नसल्याने गाडीवानासह बैलगाडी भाड्याने घेऊन मी जाई. मग एखाद्या वेळी, आलाच आहात तर जेवूनच जा, असा मला लोक आग्रह करत. मला नॉन-व्हेज चालते, हे आधी ते माहीत करून घेत. एका ठिकाणी असेच जेवत असताना पहिल्याच घासाला अतितीव्र तिखट लागले ! मग अनेकदा लिंबू पिळत आणि सारखे पाणी पीत मी ते जेवण संपवले ! " तरी, तुम्ही येणार म्हणून आम्ही तिखट खूपच कमी घातले होते -- " तिथले सरपंच म्हणाले ! बाकीचे सगळे मात्र आरामात जेवत होते !

पण, तुम्ही म्हणता ते खरे आहे -- आहार कमीही होतो आणि सूक्ष्म चवीही छान वाटू लागतात !

डमडमत डमरु ये,  
खणखणत शूळ ये,  
शंख फुंकीत ये

येइ रुद्रा

-- भा रा तांबे.

June 2019

June 30

जे काही घडते त्यात तुम्ही-मीही सामील असतो. सर्व माणसांची मने मिळून हे घडवतात. हे सगळे क्रिया-प्रतिक्रियांचे जंजाळ आहे. जग सुधारायला निघण्यापूर्वी आपल्या मनाचे काय चाललेय, हेच समजून घ्यायला हवे.

आशयच असणे महत्त्वाचे, असे मला वाटते -- घाट, कला हे नंतर -- घाट, कला हे आशय व्यक्त होण्याचे माध्यम आहे -- त्यामुळे, वाचता वाचता मधेच थांबणे घडले -- असो --

Champra sir, अर्थात मला हे आवडलंच असतं !
खूप छान नोंदवलं आहे तुम्ही. धन्यवाद म्हणत नाही ! असाच लोभ असू द्या. :)

लेख वाचून त्यावर पोस्टही दिली आहे -- लेख आवडला --

आजूबाजूची परिस्थिती आणि संबंध यांतून होत जाणारा मनाचा खून --

Champra Deshpande commented on Premanand Gajvee's post.

बिगर सेन्सॉरचे सगळे चाललेय सगळी कडे मग नाटकालाच कशाला छळछावणी ?

माझ्या नातीचा प्रवेशाचा प्रश्न मिटतो आहे, पण, तिचा प्रश्न वेगळाच आहे. नियमाप्रमाणे तिचे खेळाबाबतचे गुण गुणपत्रकात दाखवले नव्हते -- ते दाखवायला हवेत, हे मान्य झालेले आहे. पण, ते गुणपत्रकात वाढवून यायला सुमारे आठ दिवस लागणार आहेत. तोवर ही प्रवेश-प्रक्रिया खूपच पुढे जाईल. मग, त्या गुणांचा तिला फायदा मिळणार की नाही -- असा प्रश्न आहे !

महा-अद्वितीय भन्नाट कविता !

Champra Deshpande commented on Shivkanya Shashi's post.

आमूलाग्र प्रश्नांना भिडणारी सखोल कविता !

Champra Deshpande commented on Avinash Gaikwad's post.

" आंधळ्या भौतिकवादाच्या व तेवढ्याच ढोंगी धार्मिकतेच्या दरम्यान आपलं पवित्र स्थान राखण्यासाठी " -- म्हणजे काय ते कळले नाही.

मराठी नाटक वयात आले ते खानोलकरांच्या ' अवध्य ' या नाटकामुळे --

डॉ. आंबेडकरांनी सर्वांना ' शिका ' हा संदेश दिलेला असून, तुम्ही अनपढ राहण्याचा गौरव करावा, हे आश्चर्याचे आहे !

चाललेल्या चर्चेत तुमचा मुद्दा सांगा ना -- वर जे जे बोलले गेलेय त्यावर तुमचे काय आहे म्हणणे ? भाषा सगळ्यांचीच असते -- ती सगळेच वापरत असतात -- भाषा सुरक्षित राहण्यासाठी खूप लोक अनपढ राहायला हवेत, हे न पटणारे आहे -- सर्वांनाच शिक्षण मिळायला हवे.

क्रोधाने चर्चा कशी होणार ? म्हणून सुचवून ठेवले, एवढेच --

प्रमाण भाषा प्रवाही असते याचा अर्थ तिला काही नियमच नसतात वा रचनापद्धतीच नसतात, असे नाही -- ती नुसती गोंधळाची वा अराजकी अशी नसते --

आपल्या बोली भाषा, देशातल्या इतर भाषा, जगातल्या अनेक भाषा या सर्वांकडून प्रमाण भाषा काही ना काही स्वीकारत चाललेली असते -- ती स्वतःतले काही वगळतही जात असते -- हे सगळे न पाहता घडणारे किरकोळ अस्मितांचे संघर्ष उभे करण्याचे प्रयत्न हे नुसतेच विध्वंसक ठरतात --

प्रमाणभाषेचा दबदबा असूच नये पण तिचे महत्त्व मान्यच असायला हवे -- प्रमाण भाषा असे एकच स्थिर तत्त्व नसते -- तीही घडत असते, विकसत असते -- तिच्याबाबत दुराव्याचे प्रदर्शन अनाठायी असते --

अहो, ते संपवायचे नाहीच -- ते राहणारच -- पण, प्रमाण भाषा असणेही महत्त्वाचेच असते --

नुसतेच, चला, बदल आहे ना, मग स्वीकारू या -- असे नाही होऊ शकत !

शिक्षण हे कष्टसाध्यच असते आणि असणार -- व्यक्तिगणिक कष्ट कमीजास्त पडू शकतील.

लोकशाहीत संख्याबळ महत्त्वाचे ठरणारच --

Champra Deshpande commented on Deepak Rajadhyaksha's post.

माझी ' नातं ' ही एकांकिका विनयने आरबीआय साठी बसवली होती. तेव्हा दूरदर्शनच्या कार्यालयात त्याला भेटलो होतो. स्मृतीस अभिवादन !

June 15

Champra Deshpande commented on his own post.

" कार्नाडांचे राजकीय विचार त्यांनी कधीही लपवून न ठेवल्यामुळे ते सगळ्यांना ठाऊक आहेत. पण कलाकृतीच्या लेखनाच्या वेळी त्यांचं केवळ तेवढंच ध्येय राहात नाही. राजकीय विचार काहीसे मागे हटलेले दिसतात आणि मानवी मनाचा शोध हाच हेतू प्रकर्षानं सामोरा येतो. " -- उमा कुलकर्णी, पुणे लोकसत्ता, लोकरंग, १६ जून '१९.

Chitra Rajendra Joshi's photo.
वा ! शेक्सपियर वाचायची इच्छा असणाऱ्याला हा एक यथार्थमार्गप्रदीपच झालाय तयार !

इस्माईल युसुफ कॉलेजमधले हे माझे मराठीचे प्राध्यापक. सुरुवातीच्या काळात मला त्यांचे प्रोत्साहन लाभले. त्यांच्या पत्नी डॉ. सरोजिनी वैद्य त्यांच्या शेवटच्या आजारपणात पुण्यातल्या जोशी इस्पितळात होत्या -- तेव्हा मी जाऊन सरांना भेटलो होतो. सुमारे तासभर त्यांच्याबरोबर होतो. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

मराठी या विषयात मुलांना गुण खूप कमी मिळाले आहेत किंवा काहीजण नापासही झालेत त्या विषयात -- असे झाले तर मराठी भाषा मागे पडेल -- कोण घेईल तो विषय ? -- असे एक विचारमंथन चालू आहे -- त्या विषयासाठी तरी तुमचा हा फॉर्म्युला वापरायला हवा !

जिवंत चिंतनशीलतेचा एक ग्रेट नट ! एकदा, एका दिवाळी अंकासाठी मी त्यांची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती !

June 11

कला म्हणजे सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे हत्यार फक्त असे ज्यांना वाटते त्यांना कलेचा अमर्याद आवाका आणि प्रगल्भता टाळायचीच असते. परिणामतः त्यांना कलेतले काही कळायचेच बंद होते. तरीही त्यांना पूर्ण कलाक्षेत्रावर कब्जा करायचा असतो, तो का ? तर आपण म्हणतो त्याच प्रकारची अभिव्यक्ती कलेत असावी आणि इतरांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य मारता यावे, यासाठी. पण, असली आक्रमकता न जुमानणारे काही लोक असणारच !

Champra Deshpande replied to Satish Tambe's comment.

जिआ जेने ( Jean Gene ) हा गुन्हेगार होता पण, उत्तम नाटककार होता. सार्त्र आणि पिकासो यांनी त्याची रदबदली करून त्याला मोठ्या शिक्षेतून सोडवले ! हे बघा -- Genet was threatened with a life sentence, Cocteau, joined by other key figures such as Jean-Paul Sartre and Pablo Picasso, successfully petitioned the French President to have the sentence set aside. Genet would never again return to prison.

नाही तर कलेतले मूळ प्रश्न टाळून राजकीय मुद्यांवरच बोलायचे ! काही काय, बरेचजण, कला, कलाकार वा कलाकृती यांवर बोलायचे टाळण्यासाठी राजकीय विचारांची ढाल वापरतात -- ते असे का करतात, हा प्रश्नच विचारायचा नाही, असे तुमचे मत दिसतेय ! अशा प्रश्नांमुळे ज्यांचे रागलोभ जागे होतील त्यांचे कौतुक का करावे ? यावर तुम्ही काहीच बोलणार नाही, हे मला माहीत आहे. कार्नाडांच्या राजकीय मतांचे समर्थक लोक त्यांच्या नाटकांच्या आशयाबद्दल, त्यांच्या

थोरवीच्या कारणांबद्दल बोलायचे का टाळतात याचे तुम्ही उत्तर दिले पाहिजे. नुसतेच जाता जाता एखादे उपरोधिक वाक्य लिहिण्याचा हा विषय नाही. कलेच्या क्षेत्रात राजकीय विचार वर्ज्य नाहीत, असे म्हणणारे बरेच लोक कलेबद्दल बोलताना फक्त राजकीय बोलतात आणि बाकी सगळे वर्ज्य समजतात -- असे का होते, यावर सांगा ना तुमचे मत. या सरळ साध्या चर्चेने तुमचे रागलोभ जागे झालेले दिसताहेत -- म्हणजे मी ते वाक्य लिहिण्याची गरज होतीच !

Girish Patke mentioned you in a comment.

Champra Deshpande दुबेजींनी दिग्दर्शित केलेली बहुतांश नाटके ते मानत असलेल्या विचारांच्या विरोधातली होती.

मुख्य प्रश्न विचारांवरून कलेचे मूल्यमापन करावे का, हा आहे.

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande लताबाई , मिरासदार , सुधीर फडके , दुबेजी ह्यांचा काळ आजच्या एवढा कलुषित नव्हता आणि त्यांचे सामाजिक राजकीय विचार मान्य नसलेले लोक हे ' विरोधक म्हणजे वैरी ' न समजण्याएवढे सहिष्णू / प्रगल्भ असावेत !

दुबेजी स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवत असत. त्या त्यांच्या विचारांमुळेच ते दिग्दर्शक म्हणून ग्रेट होते, असे म्हणता येईल ?

द. मा.मिरासदार घ्या. ते हिंदुत्ववादी असण्यावर भरभरून बोलायचे की त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये सांगायची ?

लता मंगेशकरांची सावरकरभक्ती न आवडणारेही बरेच असतील. पण, लोक त्याबद्दल फार बोलत नाहीत -- गाण्याबद्दलच बोलतात. मग ते सावरकरभक्त असोत की सावरकरद्वेष्टे.

भावनाहीन वगैरे असा कोणताही विषयच इथे काढलेला नाहीय -- पोस्ट नीट वाचून त्यावर बोललात तर चर्चेत काही भर पडू शकेल --

तुमची गाडी बौद्धिक निष्कर्षांवर चालतेय -- चालू द्या -- आपला एकमेकांना काही उपयोग नाही --

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande मी अरुण होर्णेकरांचा बाजीराव पाहिला होता. उदय कला कैंद्रने केलं होतं बहुदा. चं. प्र. तुमची काही नाटकंही पुन्हा रंगमंचावर आणायला हवीत. आगाशे आणि विद्याधर वाटवे ह्यांचं ' खेळीया ' ही चालू शकेल

Edit

Champra Deshpande replied to Ravindra Dahad's comment.

स्मृतीस अभिवादन !

Edit

June 9

Padmanabh Pathak mentioned you in a comment.

Champra Deshpande अगदी बरोबर सर

Edit

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande मी अरुण होर्णेकरांचा बाजीराव पाहिला होता. उदय कला कैंद्रने केलं होतं बहुदा. चं. प्र. तुमची काही नाटकंही पुन्हा रंगमंचावर आणायला हवीत. आगाशे आणि विद्याधर वाटवे ह्यांचं ' खेळीया ' ही चालू शकेल

Edit

Champra Deshpande commented on his own post.

त्यांची मतेबिते काहीही असू देत, ते ग्रेट नाटककार होते ! त्यांची मते पटवून घ्यायची मला गरज वाटत नाही.

खानोलकरांचा ' एक शून्य बाजीराव ' माधव वाटव्यांनी चांगलाच केला होता -- नंतर, विशेष म्हणजे, तो शंकर घाणेकरांना साकारायचा होता असे मी खानोलकरांकडूनच ऐकले होते. पण, ते घडले नाही. आयुष्यातले एक आव्हान म्हणून प्रशांत दामल्यांनी याचा विचार करावा.

पीडित-पीडक, शोषित-शोषक तसेच वंचित-वंचक.

नथिंगनेस विज्ञानाने सिद्ध केलेला आहे ?

कल्पनेच्या भराऱ्या बौद्धिकच असतात, हे लक्षात घ्यावे --

prior to intellect -- precedes essence -- याकडे वाटल्यास लक्ष द्यावे -- इथे कुणाला काही पटवून देण्याचा हेतू नाही --

सगळे फक्त कंडिशन्ड असते असा तुमचा निष्कर्ष आहे -- तसा निष्कर्ष नाकारणारेही अनेक आहेत -- इथे चर्चा संपते --

बुद्धीच्या क्षेत्रात कधीच येऊ न शकणारे, असे अ-बौद्धिक --

जी गोष्ट बौद्धिक नाही ती बुद्धीने अमान्य करण्यात अर्थ नाही. अ-बौद्धिक भानाचे अस्तित्व जगात अनेक भागांत, अनेक भाषांत, अनेक काळांत व्यक्त झालेले आहे.

संकष्टी असल्यामुळे प्रेक्षक आले नसतील, असे प्रायोगिक नाटकवाल्यांनी समजण्यासारखेच हे !

जमल्यास सवडीने त्याचे सारतत्त्व इथे लिहिलेत तर अंदाज येईल --

Champra या पुस्तकात त्याचं फिलॉफिकल माईण्ड दिसतं. जे त्याच्या Method Acting या संकल्पनेचा बेस आहे.

June 6

BHARAT etymology:

The name Bharat is derived from the legendary king Bharat who was ancestor of kauravas and pandavas; son of King Dushyanta and Shakuntala.

आपल्या घटनेत India that is Bharat असे आहे. याचाच अर्थ, हिंदुस्तान पेक्षा भारतच योग्य आहे.

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

'मराठी नाटक समूह यांनी दिलेल्या ' जीवनगौरव ' पुरस्काराचे मानपत्र --'
खूप छान वाटला मजकूर -- थोडक्यात भरपूर !

होय -- सकाळी आभासने तुम्हाला फोन करायचा प्रयत्न केला होता -- कार्यक्रम चांगला झाला --

तुम्ही तुमचा आशय नीट निवडत नाहीत. -- म्हणजे काय ते कळले नाही -- जरा स्पष्ट कराल का ?

मनाला जे हवे आहे ते जाणवते --

May 31

बाजू घेणे, भूमिका घेणे यांमुळे कलेला का मर्यादा पडतात वगैरेवर माझे बरेच लिहून झाले आहे -- ' खेळ ' मधला माझा ' साहित्य, कला आणि भूमिका ' हा लेख बघावा.

May 2019
May 31

सादर करण्याच्या तंत्रात असणार फरक, पण, अभिनय हा नटाच्या चिंतनातून -- जगण्याकडे पाहण्यातून येतो -- त्यात काही फरक असणार नाही --

मनाचे कण न कण सुटे करून विश्वदर्शन घडवणारी भाषा !

ज्यांनी ' अग्निपथ ' पाहिलाय
त्या प्रौढांसाठीच फक्त आहे ही पोस्ट.

Champra Deshpande commented on Satish Tambe's post.

More than half a century of research in genetics, neuroscience and psychology has demonstrated that human behaviors, including social and political attitudes, are influenced by genetic and neurobiological factors (for a review see Hatemi and McDermott 2012a).

नाही -- पारितोषिकच बरोबर आहे -- ' शब्दरत्नाकर ' -- वा. गो. आपटे.

Champra Deshpande replied to Advait Mehta's comment.

Champralekhan
champralekhan.com
लोकवाङमयगृहाने काढलेले पुस्तक आहे -- शिवाय माझ्या वेबसाईटवरही आहे --

www.champralekhan.com

निरर्थकता जेव्हा असते तेव्हा ती सर्वंकश असते -- तुझ्यामाझ्यासह --
असे एकेक काही नसते तसे --

May 28

नैतिक की अनैतिक याबाबतचे निर्णय हे प्रत्येकाच्या भूमिकेतून ठरतात -- या मानसिक / वैचारिक बाबी असल्याने हव्या तशा वळवून मांडता येतात -- कोणते तपशील घ्यायचे, कोणते वगळायचे हे ठरवता येते --

एका ठिकाणी बहु-पतित्व चालते, एका ठिकाणी बहु-पत्नित्व नैतिक आहे आणि एका ठिकाणी एक-पत्नित्व नैतिक आहे -- हे दाखवून रसेल म्हणतो की, " नैतिकता ही एक भौगोलिक बाब आहे " ! अमिताभ मोठेपणी गुंड झाला की बिचाऱ्याचे बालपण किती अन्यायग्रस्त गेले होते ते समर्थन दाखवले जाते -- तेच समर्थन अमजदला उपलब्ध नसते !

' एक संघटित धर्म ' या अर्थानेच ' हिंदू ' हा शब्द वापरात आहे -- तसे नसेल तर त्याच शब्दाचा आग्रह कशाला, असे विचारले जाते.

प्रतिक्रियात्मक न वागता क्रियात्मक जगणे म्हणजे काय -- हा प्रश्न ठरेल आध्यात्मिक ! सडून मरू पण असल्या प्रश्नांना वाव देणार नाही, असे बरेच बुद्धिवादी, वैज्ञानिक दृष्टिकोणाचे पैलवान प्राणपणाने याला प्रतिकार करतात !

माणसाचे तसेच आहे -- नायक वा खलनायक -- यांतला एकच शिक्का त्याच्यावर मारता येत नाही. ( आणि तसे करायचेच झाले तर सर्वांनाच खलनायकच म्हणता येईल -- )

म्हणजे मी काही जाहीर न करताच माझ्यातर्फे तू जाहीर करणार माझे मत ! याची का गरज वाटते ? मीही कुणाला विचारत नाही, मत कुणाला दिले ते --

पळत सुटलेले मेंदू रेस संपली तरी थोडे पुढे पळणारच -- लौकरच पेकाळून पडतील --

लोकशाही स्वीकारायची आणि परत मलाच काय ते कळते, इतरांना नाही, असे म्हणायचे -- याला अर्थ नाही. लोकशाही म्हणजे देशाचे मन. त्याचे जे होतील ते होतील परिणाम --

हे असले बोलणेच इथे त्रासदायक आहे -- काहीतरी व्यक्तिगत निष्कर्ष काढायचा याची सारखी का गरज वाटते, कोण जाणे ! त्यामुळे, लिहिलेले बरेच वाया गेले, असे वाटते !

याची उत्तरे बुद्ध तत्त्वज्ञानातही आहेत -- मते बाजूला ठेवून ते वाचून पाहा -- आपण कधी भेटू तेव्हा सविस्तर बोलू -- इथे किती टाईप करत बसणार --

ते कदाचित मला माहीत नाही पण, दिसते ते सत्य पाहायलाच हवे. माझे म्हणाल तर नामजप, यज्ञ, पूजाअर्चा, मंदिरभेटी, असे मी काही करत नाही. पण, एखाद्याच्या भावनांचा आदर राखण्यासाठी आणि सगळीकडे डोकेफोड करणे मूर्खपणाचेही वाटत असल्याने, मी इकडे तिकडे नमस्कारही करू शकतो.

ती निव्वळ तथाकथित वैचारिकतेची समस्या उपरोधिकपणे सांगितली आहे. आणि एक चार लोक सोडता एकच वैचारिकता पकडून आयुष्य कंठणारे कितीसे दिसतात तुम्हाला ? वैचारिकतेच्या मर्यादा उघड्या पाडत राहणे, हे माझ्या एकूणच लेखनाचे एक वैशिष्ट्य आहे. इथे, गर्भितार्थाकडे दुर्लक्ष होते, हा मला अनेकदा येणारा अनुभव आहे. प्रत्येक वेळी, हा अमुक आहे गर्भितार्थ, असे मी सांगत बसत नाही.

तुमच्या बोलण्यात पूर्ण सत्य आहे ! जे चाललेय ते त्या सत्यासहच चाललेय ! आपणच फक्त शहाणे आणि बाकीचे फुकाच्या गप्पा मारणारे, हे तत्त्वज्ञान लोकशाही नाकारणारे आहे -- माणशी एक मत, अशी आहे लोकशाही ! नुसत्या आत्मगौरवात मश्गुल राहून उपयोग नाही !

मी तुमच्यासारखा कुठल्या मतांना वा पक्षाला बांधील नाही !

तुम्हाला एकट्याला काही सांगण्यासाठी ही पोस्ट नाहीच आहे -- यात सर्वांना कॉमन असणारे मुद्दे आहेत --

हे असे इतके वाचणे शक्य नाही -- देवनागरीत लिहा --

कोणतीही द्वेषयुक्तता ही हिंसकच असते --

ही पोस्ट सर्व द्वेषयुक्तांसाठी आहे --

ही पोस्ट सर्वांसाठी आहे --

मनस्थितीतूनच कृती घडते -- ती स्वतंत्रपणे परस्पर घडत नाही.

तुम्ही काहीही बोला, वाकडे लावणारे भेटणारच -- चलते रहनेका --

Champra Deshpande commented on Sushma Rao's photo.

'Nothing heals me like good food does #foodtherapy #mentalhealth #avalakki #mommadefood #rainyevenings'
I must visit Bengaluru again !

हॅक करणे शक्य नाही, हे पृथ्वीराज चव्हाणही म्हणाले टीव्हीवर.

' निर्वाण ' हे विज्ञान की अध्यात्म ?

तुम्ही पोस्ट पुन्हा एकदा वाचावी ही नम्र विनंती --

माझ्या एका नाटकाचे नाव आहे, ' सध्या तरी शेवट गोड ' --

Beyond Language
beyondlanguagepoetry.com
ग्रेट कवी आहे पाब्लो सॅबोरियो !

हवा काढून घेण्यासाठी नाहीय हे -- मानवी जगणे किती गधडेपणाचे आहे -- त्याला दिलेली ही एक म्हटले तर उपरोधिक अभिव्यक्ती आहे --

कुछ भी हो -- विपश्यना अमर्याद आणि सर्वांना सामावून घेणारी असते. आज बुद्धपौर्णिमेच्या दिवशी याची जाणीव असणे महत्त्वाचे !

माया आणि ममता यांच्याकडे असणार निर्देश --

एका साध्या धोब्याला राजा करणारे लोकनाट्य विसरलात काय ?

जेम्स जॉईसच्या ' फिनेगन्स वेक ' या कादंबरीची शेवटची चाळीस पाने विरामचिन्हविरहित आहेत.

अतिवास्तववादात वा स्वयंचलित कवितेत विरामचिन्हे हेतूपूर्वक टाळलीही जातात. ते सगळे तांत्रिक विषय ठीक. चर्चेतला आशयाबाबतचा महत्त्वाचा धागा सुटू नये.

Champra Deshpande replied to Satish Tambe's comment.

म्हणजे आशय निरनिराळ्या निमित्तांनी आणि निरनिराळ्या विषयांतून व्यक्त होणे -- मला तर हे चांगल्या कलावंताचेच लक्षण वाटते. बाहेर वेगवेगळे आशय असतात आणि ते शोधून कवी वेगवेगळे काही लिहीत राहतो, असे तर नाहीय . कलावंताची चिंतनप्रक्रिया चालूच असते -- तीत विषय व निमित्ते येत राहतात. आशय म्हणजे कलावंताची चिंतनप्रक्रिया. तीच नसेल तर फसवाफसवी होईल !

आशयच्या शोधात म्हणजे काय ते कळले नाही -- आणि आशयाशिवाय अर्थाच्या अनेक शक्यता कविताभानात असणे -- हे कसे ?

तेच शब्द देऊन सर्च दिल्यास हिंदी व मराठीत लेख आहेत नेटवर --

मराठीत माझ्याशिवाय कुणाला काही कळत नाही -- हाच तर प्रॉब्लेम आहे !

आपल्या साध्या भाषेत म्हणजे -- अतिवास्तववादी हा समजण्याच्या मार्गात असतो तर अस्तित्ववादी हा ' पोचलेला ' असतो !

माझ्या आकलनानुसार किंवा अज्ञानानुसार थोडक्यात सांगतो. अतिवास्तववाद ही गोंधळाचीच अवस्था असते पण तो गोंधळ नीट पूर्णपणे पाहिला पाहिजे -- त्यासाठी आपली हुशारी स्थगित ठेवली पाहिजे -- ही समज आणि तातडी त्यात असते. अस्तित्ववाद म्हणजे क्लॅरिटीच ! ते एक तडक तत्त्वज्ञानच आहे. अस्तित्व हीच मूळ गोष्ट, गोंधळ नंतर -- हे स्वच्छपणे

पाहिले जाणे. ' अस्तित्वात ' गोंधळ वा chaos नसतो. अधिक सविस्तर हवे असेल तर या फरकाचीच चर्चा करणारे लेखही नेटवर आहेत.

फार मोठे उत्तर द्यावे लागेल -- पण, तुम्ही existentialism -- असा सर्च द्या -- तुमचे काम होऊन जाईल --

सर्वांनीच ज्यातून बोध घ्यावा असा महत्त्वाचा लेख !

Yugandhar Deshpande mentioned you in a comment.

'मैत्र जिवाचे.... ज्येष्ठ नाटककार, चिंतनशील कवी, भाष्यकार आणि त्याहूनही उत्तम माणूस असलेल्या चं. प्र. देशपांडे यांना वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा !!!'
Happy birthday Champra Deshpande Sir !!

Anand Alkunte mentioned you in a comment.

'दि. १८-१०-१८ ला पुस्तक पेठेत काढला गेलेला फोटो.'
काढला गेलेला --

epaper.saamana.com
त्यावर माझे लेख आहेत -- ते वेबसाईटवर आहेत -- ' माझी नाट्यलेखन प्रक्रिया ' हा लेख बघा --

Champralekhan
champralekhan.com
' सामना ' मध्ये संकेतस्थळ पत्ता द्यायचा राहिला आहे -- तो असा --

www.champralekhan.com

Champra Deshpande commented on Swati Dharmadhikari's post.

वा ! अर्थघन ओतप्रोत कविता !

Champra Deshpande commented on Pranav Sakhadéo's post.

सर्वांगीण उत्तम कविता !

सतीश, विचारार्थ काही प्रश्न मांडून ठेवतो -- मंटोच्या कथा समजायला मी तो माहोल अनुभवलेला असायला हवा का ? वासूनाका समजायला मला तो डायरेक्ट अनुभव असायला हवा का ? तसे तर मग मला माझ्या गाववाला असणाऱ्या एखाद्याच लेखकाचे लेखन पोचेल ! कदाचित तेही नाही पोचणार ! शेक्सपियरची नाटके आपल्याला कशी पोचतात ?

याचे उत्तर द्यायचे झाले की माझे कीर्तन परत ' बांधिलकी ' आणि ' भूमिका ' यांवर येईल ! त्यामुळे, जय हिंद !

" आता अस्तित्ववादाचा काळ संपला ", ' आता ॲब्सर्डिटीचा काळ संपला ", " आता रोमँटिसिझमचा काळ संपला ", " आता अतिवास्तववादाचा काळ संपला " -- अशी विद्वत्ताप्रचुर समीक्षाही दिसते ! मग, वास्तववादाचा काळ कधी संपणार आहे ? सध्या कशाचा काळ चालू आहे ? -- हेही सांगा ना !

वडिलांशी भांडण होणे किंवा ' मी आहे हा असा आहे ' असे म्हणणे -- याने नायक इथे अस्तित्ववादी ठरतो ! -- असली समीक्षा !

काफ्का च्या ' ट्रायल ' चे मी त्याच नावाने केलेले नाट्यरूपांतर माझ्या खालील वेबसाईटवर उपलब्ध आहे --

www.champralekhan.com

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

तुम्हाला कविता लेखनाचा एक वेगळाच स्वतःचा मार्ग सापडलेला आहे, हे नक्की ! मराठी संस्कृतीने या कवितेला आपले म्हणावे हीच सदिच्छा !

भिजलेले सोयाबीन --

तिळव्यांची कविता खरेच अपवादात्मक ग्रेट आहे !

'मी एक सगुण-दुर्गुण माणूस आहे. त्याचाच एक भाग म्हणजे सोयाबीनची रस्सा भाजी करणे यात माझी मास्टरी आहे. मुलगी आणि नातवंडे आली की एकदा ही फर्माईश मला पुरी करावी लागतेच ! ती आज केली ! सोबत तोच फोटो आहे. सर्वांनी हजारदा माझी स्तुती करत त्या भाजीचा आस्वाद घेतला ! ( दिवस संपेपर्यंत त्या भाजीची आठवण काढत राहावे लागते -- ही माझी अटच असते ! ) ( आता दुसरा एक कंस म्हणजे, अशीच माझी चिकन वा मटण मसाला वरही मास्टरी आहे ! पूर्वी, एका मित्राच्या घरी, त्याचे घर मोकळे असताना आम्ही चारपाच मित्र मिळून साग्रसंगीत कार्यक्रम करायचो ! माझ्या नेतृत्वाखाली सगळेजण मी सांगेन ती कामे करत माझे साहाय्यक बनत ! )'

त्यामुळे, मी वाचलो !

पूर्वी मुंबई विद्यापीठात प्रा. बॅनर्जी इंग्लिशचे प्रमुख होते. त्यांचे एकच ओल्ड इंग्लिशचे व्याख्यान मी ' चोरून ' ऐकले होते ! तुम्ही म्हणता हीच लय त्यांच्या शिकवण्यात होती !

अंधाराचा कडाका कमी करायला लागणारच !

यापुढे मात्र आपल्या सूचनेची गांभीर्याने दखल घेतली जाईल, धन्यवाद.

यात आरती प्रभू नाहीत ? कार्यक्रमाला खूप शुभेच्छा !

अपेक्षा ठेवण्या इतका बिनडोकपणा नाहीय -- फक्त एक निर्देश करणे आहे -- गंभीरपणे आणि गंमतीने -- दोन्ही --

काहीजण तर नुसतेच बोटांचे फोटो टाकताहेत ! कुणाचेही बोट कॉपीपेस्ट केले तरी चालणार आहे !

अरे, नोटा साठीसुद्धा आटापिटा होऊ शकतो ! काही लोक खूप दिवसांनी भेटले -- त्यांच्याशी गप्पा झाल्या ! निरनिराळ्या पिढ्यांतल्या स्त्रिया मतदान कसे करतात, यावर काही अनोळखी लोकांशी चर्चा झाली !

पण, टक्केवारी कमी दिसतेय -- दोन केंद्रांवर तुफान गर्दी दिसली -- आम्हाला पावणेदोन तास रांगेत उभे राहावे लागले !

'हे तंत्र शिकतोय --'

फक्त स्टिल --

तिळव्यांची कविता ही मराठीतली अद्वितीय आणि मौलिक कविता आहे ! साठोत्तरी आणि नव्वदोत्तरी असले रकाने विसरून वाचावी अशी कविता !

'सकाळचा सेल्फी !'

Champra Deshpande commented on Shridhar Tilve's post.

मराठीतल्या या ग्रेट कविता आहेत ! मानसिक स्थितिशीलतेतून होणाऱ्या विध्वंसाचे विदारक भान देणाऱ्या मौल्यवान कविता !

निकराच्या वैचारिक प्रयत्नातली शोकात्मता !

वा ! याचा लेख व्हावा !

लोकशाहीत सर्वांच्या कलानेच -- म्हणून खूप वेगाने नाही -- असेच बदल होणार --

वा ! आजच्या जगातला हा एक महत्त्वाचा विषय -- त्याची कल्पना तरी आली ! मांडणी खूपच क्लॅरिटी देणारी आहे ! धन्यवाद !

कुठलीही दोन माणसे एकत्र आली की सहिष्णुतेला संधी असतेच !

किंवा, मीच फक्त केकाटणार, आणखी कुणी नाही -- यात अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधात गेल्याचे पाप लागणार !

फायनल कळणारे आणि लोकशाहीतले कळणारे -- केकाटून उपयोगच नाही ! अपना अपना मत देखनेका खाली --

क्रांतीचे बघू -- पोस्ट टाकणाऱ्याला नका मारू ! -- अशा उद्वेगाने थोडीच क्रांती होणार आहे ? !

आपण सगळे एकत्र जगत असतो -- तुम्ही कसे तुमच्या पोकळीत जगता त्याचे रहस्य तरी सांगा --

आत्मदहन वा आत्महत्या हे दोनच पर्याय असणे म्हणजेच जगण्यातली ॲब्सर्डिटी !

Vidyasagar Adhyapak mentioned you in a comment.

Champra Deshpande धन्यवाद सर तुमच्यामुळंच मी नाट्यलेखन शिकलो

Champra Deshpande commented on Vidyasagar Adhyapak's post.

अभिनंदन !

बघू -- तुमच्या इतके नीट निरीक्षण जमते का ते --

जो तुम्हाला वेडेपणा वाटतो,तो मला जिवंतपणा वाटतो!...

ते बहुमतच योग्य दिशेला वळविण्यासाठी भूमिका घेणे जरुरीचे असते, सध्याची परिस्थिती ही अघोषित आणीबाणी आहे..

असे वेडे होणे हे ?

लोकशाहीत जे काय असेल ते बहुमताने भोगायचे असते -- त्यात तक्रार कसली ?

एक वेगळा प्रकार !

होय -- या गोष्टी मी पाळतोच आहे --

जगातल्या सगळ्या गोष्टींबाबत आपण संवेदनशील नाही राहू शकत -- त्याचा त्या संबंधितांना राग असू शकतो -- या अर्थाने कुणीच चांगले वागू शकत नाही ! एक ॲब्सर्ड अतिशयोक्ती !

' खानदान ' चित्रपटात सुनील दत्तचे तसे होते --

एम आर आय नॉर्मल आहे -- डायबेटिस, बीपी काही नाही --

होय -- डॉक्टरी सल्ल्यानेच चाललेय --

यात प्रकाशचा मोठाच सहभाग आहे !

डॉक्टरांना विचारून STUGERON -- 15 --

सर मलाही गेल्या आठवड्यापासून अचानक हा त्रास सुरू झालाय .

फरक इतकाच, की पाठ टेकल्यावर किंवा झोपेत / झोपून उठल्यावर, कुशीवर वळताना प्रचंड वेगात, Meri-go-round सुरू होतं, पण जेमतेम अर्धं मिनिट !

केले ते -- नॉर्मल आहे --

हे खरेच घडले होते -- इथे अनेक फ्रेंडसना माहीत आहे --

डॉक्टरांना विचारून तुम्ही म्हणता तीच गोळी चालू आहे --

एक महिन्यापूर्वीच सगळ्या तपासण्या करून घेतल्या -- सगळे रिपोर्टस ' आदर्श ' आहेत ! नो प्रॉब्लेम !

पण, निदान लेखकांकडून तरी हे अपेक्षित नाही, असे म्हणून त्यांना किंचित श्रेष्ठत्व द्यायला माझी हरकत नाही !

ते बाकीचे जाऊ द्या सगळे -- लोकशाहीची तुमची कल्पना काय आहे ते थोडक्यात सांगा. माणशी एक मत, ही पद्धत योग्य की अयोग्य इथून सुरुवात करा --

जरूर -- असेलच ना तसे -- लोकशाहीत जमेल ते करून निवडून यावे -- हे चालूच असणार -- इकडून तिकडे उड्या मारणे, आघाड्या, युत्या करणे यांत तत्त्वज्ञान कसले शोधणार ?

असो -- हसून सोडून देऊ --

मी ते वाक्य तसे हेतूपूर्वक लिहिलेले आहे -- समजून घेता आले तर बघा --

हेच काय असे खूप काही मला कळत नाही -- आणि अमर्याद नसणाऱ्या तुकड्यातुकड्यांच्या मूल्यांमुळेच मानवी जीवनाची नासाडी होते, हे तुम्हाला कळते का, हेही बघा --

मुळीच नाही -- मी स्वतः मतदान चुकवत नाही --

असेही एक प्रामाणिक मत !

सॉरी ! एक तर तुम्ही ही पोस्ट नीट वाचलेली नाही किंवा तुम्हाला हवे तेच त्यात नसल्याने तुम्हाला राग आला असावा ! ही अगदी तर्कशुद्ध पद्धतीने लिहिलेली साधी व प्रामाणिक पोस्ट आहे ! तुम्हीही असे टिंगलीचे बोलू नये !

तीही तुमचीच मर्जी ! तुम्हाला कुणी सक्ती नाही करू शकत !

तो माझा घटनादत्त अधिकार आहे --

तुमची मर्जी ! तुम्हाला कोण आव्हान देणार ?

शांत व्हा -- मी नम्रपणे सांगू इच्छितो की मी कोणत्याही जातीय वा धार्मिक विचारधारेचा प्रतिनिधी नाही -- आणि तरीही तुम्हाला न पटणारे काही माझे म्हणणे असू शकते -- त्याला तुम्ही सहिष्णुतेने वाव ठेवावा --

आपल्याला लॉजिकची सवय असते -- इतका वेळ ते टाळता येणे ही साधी गोष्ट नाही ! ' ते जगणे ' वाचकांच्या डोळ्यांपुढे उभे करण्याचे लेखकाच्या शैलीचे सामर्थ्य ते हेच !

असे एकमेकांवर ओरडणारे मतपरिवर्तन नाही करत -- मतपरिवर्तने कशी होतात ते तुम्हाला माहीत नाही ?

सुदैवाने, या वातावरणावरच्या माझ्या इथल्या बऱ्याच पोस्ट या त्यातली ऍब्सर्डिटी व्यक्त करणाऱ्या असतात -- हे समजणारेही इथे बरेच आहेत !

तुम्हाला माझे मूल्यमापन करणे महत्त्वाचे वाटते -- मला या सगळ्यातली तद्दन ऍब्सर्डिटी व्यक्त करावीशी वाटते -- मी काय केले पाहिजे याचा विचार मला करू द्या -- आणि सगळेच लोक जे ' निष्ठा वाहतात ' ते मला ' धन्य ' वाटू शकतात, हेही समजून घ्या !

तमाशातली मावशी --

मी बोललोय त्याच्याशी

माझ्या कवितेत असे फारच क्वचित घडते --

मला हे अजिबातच मान्य नाही -- यावर माझा एक मोठा लेख आहे --

Ravindra Damodar Lakhe mentioned you in a comment.

फोन करा Champra स्वप्नीलला

काफ्काच्या ' ट्रायल ' या कादंबरीतल्या नायकाचे नाव आहे जोसेफ के. लेनी हे त्याच कादंबरीतले एक पात्र आहे.

भूमिकन्या मी मुळातले वाचलेले नाही -- युगंधरचे नाटक त्याने स्वतःच दिग्दर्शित केलेले आहे.

प्रश्न कळला नाही --

असे ज्याला जे सुचेल ते समोर यावे -- त्यातूनच काही घडू शकेल --

ವಿಶ್ವ ರಂಗ ಭೂಮಿ ದಿನ: ರಂಗಶಂಕರದಲ್ಲಿ ಬೀದಿಯೊಳಗೊಂದು ಮನೆಯ ಮಾಡಿ

kannada.oneindia.com

होय --

छान करतात कानडीतले ' ढोलताशे ' ! तिथल्या प्रेक्षकांना खूप आवडलेय हे नाटक !

Sushma Rao's photo.

Nice! Champra Deshpande and all❤

साध्या करमणुकीच्या गाण्यातही फार हाल करून घेतात हो !

जरूर -- सध्या जरा व्यस्त आहे -- पण, करू या हा उद्योग --

निवडून येण्याची उपयुक्तता किंवा पाडण्याचे उपद्रवमूल्य !

Varshha Mahajan mentioned you in a comment.

Champra Deshpande ग्रुप च नाव सुचवा. तो बनवते. मग पुढचं मार्गदर्शन द्या

फारच छान कल्पना ! नेतृत्व तुमचे, पहिला सभासद मी !

Champra Deshpande commented on Anil Koshti's photo.

'हा श्री दिलीप प्रभावळकर यांना भेट दिलेला चिमणराव. हा फोटो पोस्ट केलाय ओरिजनल पेंटिंग सरांकडे.'

' तो ' विनोदाचा फीलही आलाय !

अरे, हा प्रवाह थांबवू नकोस -- भारी आहे !

-- तू तो लेख इथे देऊ शकतोस का, ते बघ -- मला ते तंत्र अवगत नाही --

' एक शून्य बाजीराव ' मधले एक वाक्य आठवले - " वकील रडले नसतील -- त्यांच्या डोळ्यांत पाणी आले असेल -- "

मला दिसतेय तेवढे बोलतो -- पटवून देण्याचा प्रयत्न करत बसणार नाही --
' ठायीच बैसोनि करा एकचित्त ' म्हणजे धर्म ! धर्म म्हणजे देवपूजा, वारी वा अमरनाथ नव्हे. विदीर्ण मन म्हणजे अधर्म ! विदीर्ण मनाचा कुणीही माणूस विवेकीबिवेकी असू शकत नाही ! विदीर्णता आहे तशी चालू ठेवण्यासाठी आस्तिक लोक बनावट धर्म तयार करतात आणि नास्तिक लोक बनावट विवेक ! आपण एका ' चांगल्या ' पायावर आधारित जगतो आहोत, असा भ्रम सर्वांनाच गरजेचा वाटतो !

एक वेगळीच समस्या !

तुम्ही नाही ? भारतातला सुपरस्टार आहे तो ! की विचारसरणीचा प्रॉब्लेम येतो इथेही ? गंमत ही गंमत म्हणून घ्या हो -- व्यक्तिगत मूल्यमापने छोड दो !

नाही -- खूप वर्षे झाली पाहून !

विदीर्ण मनाने तुम्ही म्हणता तसे चांगले काही घडू शकत नाही, असे काहींना दिसते. तुम्ही खुश असाल तर तुमचा प्रश्नच नाही. जे अधिक खोलातले काही शोधू इच्छितात तेही प्रामाणिकच असतात, एवढेच !

तुकारामाच्या मते धर्म म्हणजे ' एकविध मन ' -- यालाच जेके ' इंटेग्रिटी ऑफ माइंड ' म्हणतात -- विदीर्णता म्हणजे अधर्म ! आता कशाला अज्ञान म्हणायचे हे ज्याचेत्याने पाहायचे !

धार्मिक असणे म्हणजे ख्रिश्चन, हिंदू असणे नव्हे -- हीच तर पोस्ट आहे -- मग तुमच्या मते धार्मिक म्हणजे काय, ते सांगा --

पूर्ण मानवजातीला धार्मिक नसणेच सोपे पडतेय -- त्यामुळेच तर इतक्या समस्या, संघर्ष आणि हिंसा ! तुमच्या मते धार्मिक म्हणजे काय, ते नीट कळले नाही.

जे आहे ते चालू ठेवणे -- सर्व तऱ्हेचे संघर्ष आणि हिंसा आपोआप चालू राहतात -- बाकी ' विवेक ' वगैरे निरुपयोगी शब्द वापरत राहता येते !

तुम्ही धार्मिक असण्याचा अर्थ काय करता त्यावर ते अवलंबून आहे.

Champra Deshpande commented on Sushma Rao's photo.

'Best way to celebrate World Theatre Day is to watch an amazing play, and we have the right thing for you. Ranga Shankara's popular play, Beediyolagondu Maneya Madi is back! Our way of celebrating World Theatre Day..! Come and join us in this celebration 27th March, Ranga Shankara, 7 30 PM Beediyolagondu Maneya Madi A play in Kannada directed by Mohit Takalkar Written by Cham. Pra. Deshapande @[100000669434144:2048:Champra Deshpande] Adapted by @[1513960629:2048:Surendranath] Tickets are available at Ranga Shankara and www.bookmyshow.com'

कानडीत, ' ढोलताशे ' ! माझे बालपण कर्नाटकात गेले -- कानडी तर माझी बालपणीची प्रिय भाषा !

दर्शनी अर्थ वेगळा -- आतला वेगळा --

राजकीय विचारांची स्वायत्त विद्यापीठे याबाबतची माझी विचारविदारक पोस्ट पाहावी --

आपले सगळ्यांचेच सगळेच भंगार -- त्यातूनच साधायचा मौल्यवान संवाद !

जे दोनतीनदा दिसले त्यावरून लिहिलेय -- तुम्ही यावर अधिक अचूकपणे बोललात तर छानच -- माझेच म्हणणे रेटायचेय, असे काही नाही --

स्वभाव भिडस्त असण्याने कुणाचे अवमूल्यन होते असे मला नाही वाटत.

जो खाई विरोधी विचारांच्या

चेवाने हाणलेल्या वाहाणा

आणि तरीही चिडवे त्यांना पुन्हा पुन्हा

तोच जावई शहाणा !

Ravindra Damodar Lakhe mentioned you in a comment.

मी त्या योग्यतेचा नाहीय खरं तर पण एक नाव आवर्जून घ्यावं लागेल अश्या कवींमध्ये. ते म्हणजे Champra Deshpande.

ते सर्व असूनही, ' बरोबर ', ' योग्य ' काय असे विचार येत असतात -- ते फेटाळू नयेत.

वरील जनरेटर मधून तयार झालेली एक प्रेमकविता --

For My Erudite Car

A Love Poem by pintu

Roses are red,
Violets are blue,
Work is erudite,
And so are you.

Orchids are white,
Ghost ones are rare,
List is long,
And so is your hair.

Magnolia grows,
With buds like eggs,

The face is smooth,
And so are your legs.

Sunflowers reach,
Up to the skies,
My box is black,
And so are your eyes.

Foxgloves in hedges,
Surround the farms,
A welcome is warm,
And so are your arms.

Daisies are pretty,
Daffies have style,
Your way is pleasant,
And so is your smile.

A car is beautiful,
Just like you.

या बाबतीत आणि इतर अनेक शंकांसाठी यास्मिन शेख यांचे ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' हे पुस्तक संग्रही ठेवावे.

अनेक लिंगी शब्द असतात तेव्हा शेवटच्या शब्दाप्रमाणे क्रियापद असावे, असा नियम आहे.

Poem Generator
poem-generator.org.uk
https://www.poem-generator.org.uk/ -- हेही बघा --

हे अवतरण चिन्हातले वाक्य माझे नाहीय -- शंकराचार्यांचे आहे !

मी एका कवयित्रीला विचारले होते की तुम्ही अशा प्रभुचरणी लीन झाल्याच्या कविता का लिहिता -- खऱ्या तुमच्या कविता का नाही लिहीत ? तर त्या म्हणाल्या की एक म्हणजे या कविता काही धार्मिक मासिके छापतात, त्यामुळे मला बरे वाटते -- दुसरे म्हणजे एकदोनदा मी खऱ्या माझ्या कविताही लिहून पाहिल्या तर हे म्हणाले की तू माझी बदनामी करायला लिहितेस का ?

तिथे कसली चर्चा नका घडवू -- नाही तर ' कुंग फू ' व्हायचे !

हे टीव्ही चर्चेतले वाक्य आहे ! माझे नाही ! असे म्हणण्याएवढे मला कुठे आहे ज्ञान ?

हे फेसबुक तुझे ऐकतेय आणि माझे ऐकत नाही -- असे का ? मी टॅग केलेले ते घेत नाही --

समता दिन म्हण -- दीन नव्हे -- स्त्री-पुरुष नात्यातली समता -- पण, नसेल आवडली कविता तर जाने दो --

अलिकडच्या काळातला ग्रेट चिंतनशील लेखक ! मी दहा वर्षे मुंबईत होतो. खानोलकर मालाड पूर्व ला राहायचे आणि मी मालाड पश्चिम ला ! आमची छान मैत्री होती ! त्यांच्या बऱ्याच लेखनाचा मी पहिला श्रोता असायचो !

Champra Deshpande commented on Pradeep Vaiddya's photo.

'हे असं काही ... नियमित इथे पोस्ट करावं असा विचार आहे ...'
महत्त्वाचा उपक्रम ! यातून एक महत्त्वाचे पुस्तक तयार होईल ! मराठीत असे काम फारच कमी आहे !

मला ते नाटक माहीत नाही --

हा माणसाच्या जगण्यातला एक महत्त्वाचा प्रश्न आहे -- तो सर्वच माणसांना प्रस्तुत आहे -- या बाबतीत, युद्धाचे दुष्परिणाम कुणी कुणाला शिकवावेत ?

काय करावे किंवा हा प्रश्न समजू शकतो का, हा पुढचा भाग आहे. मुळात, या पोस्टमध्ये दिलेली सर्व वैशिष्ट्ये बाळगत मी जगणार आणि शिवाय मोठा कळवळा दाखवत सर्वसामान्यांना ज्ञानामृत पाजणार की, " युद्ध फार वाईट असते -- त्यात कुणाचे कुणी मरत असते -- घरबसल्या युद्धज्वर वा युद्धाचा उन्माद निर्माण करणारे तुम्ही बेफिकिर लोक आहात, वगैरे " -- ते निरर्थक आहे, कारण, माझ्यातही युद्धाची बीजे आहेत, असे म्हणायचे आहे.

पोस्टमधली वैशिष्ट्ये पाहिलीस तर तो स्वतःच्या अलग असण्याला महत्त्व देत असतो -- इतरांशी संघर्षात असतो -- तो युद्धविरोधी ?

युद्ध हे मनोवृत्तीतून येते, हा आहे विषय --

थोडक्यात, तुझ्या मते, युद्धविरोधी कुणीच नाहीय ! -- हाच प्रश्न इथे आपल्या सर्वांच्या विचारार्थ घेतलाय !

व्यक्तिगत प्रतिक्रिया म्हणून युद्ध करणे आणि ' तू युद्ध करतोयस असे समजूच नकोस ' म्हणजे कर्तृत्व स्वतःकडे घेऊ नकोस -- यांत काही मूलभूत फरक असावा.

Hitler and Mussolini were only the primary spokesmen for the attitude of domination and craving for power that are in the heart of almost everyone. Until the source is cleared, there will always be confusion and hate, wars and class antagonisms.
-- Jiddu Krishnamurti.

Champra Deshpande commented on Chitra Rajendra Joshi's post.

छान लिहिलेय -- त्या चित्रांचे गांभीर्य पोचतेय !

" इषय संपला ! " हा ' बापमाणूस ' या मालिकेतला संवाद आहे -- त्यात बुध्या वगैरे काही नाही. बाकी असो.

माहीत नाही -- घटनेचे कलम ३५२ -- आणि कॅबिनेटची मान्यता ! हे सगळ विवादास्पद होते, हे स्पष्ट आहे, पण, बेकायदेशीर होते, असे वाचनात नाही.

तिथे मताचा नसतो प्रश्न -- कायदाच ठरवतो !

तुझे ३ नंबरचे वाक्य अमान्य !

भेटून बोलू -- इथे इषय संपला ! काहीही असतील माझे विचार पण ते लोकशाही चौकटीतलेच होते -- सर्वांना पटायची गरज काय ?

मुळीच नाही -- त्यांच्या पोलिसीजही पटत होत्या -- बँकांचे राष्ट्रीयीकरण उदाहरणार्थ -- त्यामुळे जाता जाता आम्हालाही अनेकांना पदोन्नती मिळाली ! त्यांना आणीबाणी लावणे भाग पाडले गेले, हेही पटत होते !

आणीबाणी आणणे !

Sureshkumar Vairalkar mentioned you in a comment.

Champra
पळसखेडा,महानोरांचे गाव.लगतच्याच फर्दापूर(अजिंठा लेणी)पासून पूर्व दिशेला पन्नास Km वर माझा गाव.

सदर विषयावर एक सविस्तर पोस्टच दिलीय, ती पाहावी.

होय --- तिथून पळासखेडा जवळ आहे.

Champra
कळमसरा-लोहारा....सोयगाव-शेंदुर्णी-पाचोरा दरम्यानचे ?

' शहाणीसुरती माणसे ' यावर उद्या बोलेन -- आज वेळ मिळाला नाही --

कोणत्याच ' बाजूचे ' तसे बोलत नाहीत !

खुद ढूंढो और सबके लिये यहाँ दे दो !

खरे आहे. शिवाय, निर्णयशक्तीत कमी पडून ते गोंधळलेलेच राहिले !

सत्ताधाऱ्यांकडे स्वतःची जाहिरात करण्याचे, लोकांशी आपुलकी साधण्याचे, साधे-सरळ बोलण्याचे -- असे बरेच मटेरियल उपलब्ध असते. त्यांना क्रोधाचे प्रमाण माफक ठेवता येते. विरोधकांना ते अवघड असते. ते प्रतिक्रियांत अडकून पडतात -- हेच तर म्हटलेय.

संताप, हेटाळणी, कुत्सितपणा, शिव्यागाळी अशा मार्गांनी विचारांची देवाण-घेवाण ?

Rahul Bansode mentioned you in a comment.

Champra Deshpande धन्यवाद गुरुवर्य. आपले मोलाचे मार्गदर्शन आहे.

पेपरसाठी लागणारी पेन्स, वगैरे साहित्य आणि मुख्य म्हणजे हॉल तिकीट बरोबर घेतले ना याची खात्री करून घ्या.

कशाला ? माणूस हा एक गोंधळालेला प्राणी असल्याचे मला दिसते ! त्यामुळे, तुम्ही म्हणता त्या शक्यतेपेक्षा तुम्हीच मोठे राजकीय विचारवंत होण्याची शक्यता जास्त आहे ! त्या धोक्यापासून सावध राहा !

piece नव्हे -- peace -- म्हण --

तुम्हाला असे का वाटत असेल याचाही सर्वांनी ' विवेकाने ' विचार करावा, हेही या पोस्टमध्ये गृहीत आहे !

लिंक देण्याचे काम कुणीही करू शकतो -- ते वेगळे काम आहे -- त्यासाठी तो विशिष्ट पेपर लागत नाही.

' सत्ताकारणाचा संबंध नसलेली राजकीय भूमिका ' हा प्रकार खरेच आपण शिकलेलो नाहीय ! याचा उदंड प्रसार व्हायला हवा !

सारांश, युद्धखोर असणे भाग आहे, पण, गप्पा -- शांतता, मानवतावाद यांवर चालू ठेवाव्यात !

पण, मानवतावाद, शांतता -- हे खोलातले बोलत राहायचे ! -- ते निरर्थक आहे, हेच म्हणायचे आहे !

कोणतीही राजकीय भूमिका ही युद्धविरोधी असू शकत नाही -- ती कशाच्यातरी विरोधातच असते !

" माझे युद्ध हे युद्धखोरांशी आहे ! "

तो वदतो व्याघात म्हणून काळा विनोद ! कोणतीही राजकीय भूमिका ही इतर राजकीय भूमिकांच्या संघर्षातच असते !

दाम मे कम काम मे दम !

संविधानसुसंगत --

मी तो शब्द मराठी करून घेतलाय --

छे छे -- परीक्षण कसले -- पाहिल्यावर आलेले स्फुट विचार --

इतक्या व्यक्तींच्या संपर्कात राहून त्यांतले कण न कण स्मृतीत गुंफून तुम्ही हे सगळे इतके छान मांडले आहेत की त्याबद्द्ल खास अभिनंदन !

डायबेटिस संबंधी काही संशोधन आहे --

मे. पुं. रेग्यांची तीन व्याख्याने मी ऐकली होती -- त्या आधारावर हा प्रश्न विचारला आहे. ' निर्वाण ' म्हणजे इझम असणार नाही -- यासाठी हा प्रश्न इथे प्रस्तुत आहे.

' निर्वाण ' अवस्थेला आंबेडकरांनी स्वीकारलेले आहे का ? मूळ बुद्धाचा तो गाभा आहे.

डॉ. पळवेकरांनी सांगितलेय ते बरोबर आहे .

आंबेडकरांनी सांगितलेला बौद्ध धर्म आणि मूळ बुद्धाने सांगितलेला धर्म यांत फरक आहे का -- हा मुद्दा या चर्चेत महत्त्वाचा ठरू शकेल --

इथे नाही -- ' खेळ ' या अंकात --

' गधडी धारणा ' अधिक व्यापक म्हणजे सर्व संबंधित बाजूंचा समावेश असणारा प्रकार आहे !

खरे तर समजून घेण्याचाही प्रश्न दिसत नाही ! कोणत्या बाजूवर विश्वास ठेवायचा हे आधीच ठरलेले असते ! आणि त्या बाजूइतके खरे काही असूच शकत नाही, ही खात्री असते ! आणि स्वतःच्या त्या भ्रमात सर्वांनी सहभागी होणे हेच फक्त विवेकाचे आहे, अशी श्रद्धा असते ! आणि तुम्ही अज्ञान मान्य करता म्हणजे विवेकाला वा सत्याला नकार देण्याचा पळपुटेपणा करता -- अशी ही गधडी धारणा असते !

पूर्ण जनतेची मजबुरी !

अहो, एकेका घोटाळ्याची पाच पाच हजार पाने असतात ! क्या बात करते हो !

डोळे येण्याची साथच असावी -- आमच्या घरात मी चौथा आहे --

व्यामिश्रता म्हणत याचे उदात्तीकरण करत राहावे !

अभिराम भडकमकर, प्रकाश खांडगे यांच्यासह महाराष्ट्रातील चार कलाकारांना उद्या राष्ट्रपतींच्या
maharashtradgipr.blogspot.com
वा ! आनंद वाटला ! अभिनंदन !

त्यावर काय मार्ग काढावे, हा आहेच प्रश्न -- पण, समांतरपणे सगळ्यांना बुद्धिप्रामाण्यवादी करण्याचे प्रयत्न चालू राहू द्यात !

मला परदेशी स्त्रियांच्या येतात रिक्वेस्ट -- मी त्या दिसताक्षणी उडवून लावतो --

तर्कित

पूर्वाकलनीय, अपेक्षित

निरनिराळ्या मार्गांनी पक्के, ठाम, घट्ट, हट्टी, हेकट होत जाण्यानेच मानवी जगण्याची वाट लागत जाते, असे मला दिसते. पक्क्या बौद्धिक समजुतींनी वा मतांनी इथे स्वर्ग अवतरेल यावर माझी श्रद्धा नाही. त्यामुळे आपल्या दोघांच्या आकलन-प्रक्रियांत फरक असू शकतो. जो भी है -- आपापले स्वातंत्र्य असू द्यावे, हेच भले !

इथल्या पोश्टी द्या सोडून -- निवडणुकांचा काळ आहे -- आज इकडचे बोलणारे उद्या तिकडच्या पक्षात, असे खूप कृतिशील अपवाद सापडतील तुम्हाला ! पण, कशासाठी शोधताय अपवाद ?

भाकितक्षम सगळेच असते -- बरोबर भाकित होणारे हवे --

एखाद्या कथेचा शेवट प्रेडिक्टेबल आहे म्हणजे आधीच सांगता येईल -- ओळखता येईल, असा आहे.
म्हणजे आपले म्हणणे असे का की जे बरोबर येणार असते ते prediction?

अनुमेय मध्ये अनुमान चुकू शकते -- प्रेडिक्टेबल म्हणजे ' बरोबर ' ओळखता येणे, भाकित करता येणे. अनुमेय मध्ये तो अर्थ येत नाही.

‘ भाकीतीय ‘ हा शब्द वापरात असल्याचं दिसून येत नाही. predictable साठी अंदाज, भाकीत शब्द वापरूनच वाक्यरचना केली जाते. त्याचं विशेषण केलं जात नाही.

साधारणपणे भाषेमधे प्रसंगानुसार, संदर्भानुसार शब्दप्रयोग केले जातात. एखाद्या घटनेच्या संदर्भात ‘ भाकीत ‘ वर्तवलं जातं. उदा. निवडणुकीच्या निकालाविषयी भाकीत (predictions) म्हणजेच अंदाज या अर्थी !
हवामानाचा अंदाज (prediction) वर्तवला जातो.

एखाद्याचा स्वभाव किंवा वागणं/वर्तणूक unpredictable (निश्चित सांगता येत नाही) आहे, हे सांगताना ‘ अनाकलनीय ‘ किंवा ‘ लहरी ‘ शब्द वापरतात. त्याचप्रकारे स्वभावाच्या बाबतीत predictable साठी ‘ आकलनीय ‘ हा शब्द वापरता येईल. कुठल्या संदर्भात वाक्य आहे, त्यावर अवलंबून आहे.

हिमालयातलं हवामान unpredictable असतं, हे सांगतानाही ‘ लहरी ‘ शब्द वापरतात.

मग समजायच्या आधीच काय करावे ?

आपण ' वाटलंच होतं / उघडच होतं / अपेक्षितच होतं वगैरे बोलतो , तसं हे भाकितीय होतं म्हणणं अवघड वाटतं कदाचित पुस्तकी शब्दाची गरज असताना ' भाकितीय ' ठीक आहे.

आधीच ओळखता येणे -- याला काय ?

शब्द सोपाही असावा आणि तोच अर्थ व्यक्त करणाराही असावा -- प्रेडिक्टेबल मध्ये असणारा अंदाज हा ' बरोबर अंदाज ' आहे -- नुसता अंदाज नव्हे. ' अंदाजपंचीय ' मध्ये ' दिले ठोकून ' असा अर्थ येतो, तो इथे नाही चालणार.

नाही -- लेखक आठवत नाही -- नेटवर पाहता, ते पुस्तक समीर ओकाशा यांचे होते, असे दिसते.

philosophy of science -- या नावाचे एक पुस्तक वाचले होते -- त्यात शास्त्राची प्रक्रियाच संशयास्पद असल्याचे दाखवले होते !

हवाबिवा देण्यात मला इंटरेस्ट नाही -- मानवी बुद्धीचा वापर हा माझा नेहमीच एक केंद्रिभूत विषय असतो.

Nitin Bharat Wagh अहो महाशय, तुम्हाला माझे वाचण्याचा त्रास होतो तर नका ना वाचू -- तुम्ही इथे येऊन, चाललेल्या चर्चेत विक्षेप कशासाठी आणत बसता ? या चर्चेत भाग घेणाऱ्यांचाही तुम्ही अधिक्षेप करत आहात ! मी सहसा कुणाला ब्लॉक करत नाही, पण, तुमच्या बाबतीत, अनेकदा सांगून झालेले असल्याने, आता इलाज नाही -- निरोपाचा नमस्कार !

माझी तागडी
जराशी वाकडी
पैसाच पैसा
देते माझी फाकडी.

कविता म्हणजे काही सिद्ध करणे वा बौद्धिक व्यायाम करणे नव्हे. त्यामुळे, इथे विजय-पराभव वा मान्य-अमान्य करणे -- असले प्रकार अप्रस्तुत !

अज्ञात हे बौद्धिक नसल्याने तसे होत नाही --

जगातले अनेक मोठे कवी हेच सत्य बोलून गेलेले आहेत.

मननिर्मितच --

'हाच तो तुकारामाचा ' रिता ठाव ' --'

'हाच तो तुकारामाचा ' रिता ठाव ' --'
तुकाराम आणि जेके होकार देतात --

Champra Deshpande replied to Arun Naik's comment.

मजा आली ! तुमचे ' नाटक ' चे संपादन आणि अंक संग्राह्य झाले !

Rajkumar More mentioned you in a comment.

Champra Deshpande सर, थोडी गंमत हो! बेन किंग्सले हा माझा आवडता अभिनेता आहे!

मी विचारार्थ एका अभिनेत्याचे वाक्य दिलेले आहे --

हा २० व्या शतकातला जगातला एक महत्त्वाचा ' कवी ' मानला जातो ! तुझे किंवा आणखीही मराठी बांधवांचे मत वेगळे असू शकते !

उदाहरणार्थ प्रतिमांची गर्दी कमी ---

सब ' उजाड ' मत करो, बस !

Conversations@DSM: Girish Patke

youtube.com

या मुलाखतीतून गिरीशच्या कामातल्या समृद्ध वैविध्याचा सर्वांना चांगला अंदाज येऊ शकेल !

माझी विनंती आहे की तुम्ही नका त्रास घेऊ.

मी काहीही गंभीरपणे म्हटले तरी तुम्हाला ते विनोदी वाटते, हे मला माहीत आहे. तिकडे मी दुर्लक्ष करत असतो हे तुम्हीही माहीत करून घ्या.

सिगरेट कितीही पिऊ द्यात हो पण धूर आईच्या तोंडावर नका सोडू, अशी काहींची माफक अपेक्षा होती पुलंकडून !

' आम्हांसी तो सदा रिकामीक ।। '

सगळीच कामे करतोय तर स्पेशालिस्ट कशाला म्हणायचे ?

सतत सावध असणे गरजेचे आहे --

आज तुकाराम समजून घेताना याचा किंचित जरी हातभार लागला तरी खूप झाले -- मुख्य म्हणजे तुकाराम समजून घ्यायला प्रवृत्त करणे -- हेही आहे --

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande झपाट्याने बदलणारे नवीन वातावरण साहित्यात पकडण्याची आपली क्षमता संपत आली आहे , हे वाढत्या वयामुळे जाणवून आपण आता आऊटडेटेड झाल्याची भावना अध्येमध्ये डोकावते . बाकी अजूनही गुदामात कथानकांचा स्टॉक संपलेला नाही . त्यामुळे >> आधुनिक कथेतली अतिवास्तव अनाकलनीयता वा कल्पनेला खूप

काम देणारा गुंतागुंतीचा घाट यांची या कथेला गरज पडत नाही. त्याशिवायही ‘ सांगण्यासारखे ‘ जे आहे ते सर्व ही कथा वाचकाला सहज पोचवते.<< हे तुमचे वाक्य मला दिलासा देऊन गेले .

तुम्ही नक्कीच मौल्यवान लिहीत आहात -- मिशन समझके चलने दो --

होय -- ती आता तुमचीही पब्लिक पोस्ट झाली -- जशी माझी आहे --

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande मला हि त्यातलं काहीच कळत नाही . मी add to your timeline आलं आणि ते नाठाळ वाटलं नाही तर ते ऍड करून टाकतो.
आता वॉल सारखच सगळ्यांना दिसतं का ते ठाऊक नाही .

कोल्हापुरात तर गुडघ्याला हेडेकवालेही असतील ना !

इस पोस्टपर इतना सन्नाटा क्यों है भाई ?

रिकामीक -- हा शब्द असलेले तुकारामाचे अनेक अभंग आहेत -- ते वाचलेत तर या शब्दाच्या तुम्ही म्हटता त्या अर्थाचा तुमचा आग्रह राहणार नाही -- तुकाराम ही एक ' नवी ' गोष्ट आहे -- नव्यासाठी शब्दांनाच जमवून घ्यावे लागते -- शब्दांना वेगळी परिमाणे येतात --

दात तुटो की लाडू तुटो, अशी जिद्द हवी !

तसा हट्ट बाळगणाऱ्या काही मित्रांच्या अनुभवांनतर हे लिहिलेय -- ते मूर्खपणा करताहेत, असे म्हणण्या ऐवजी -- अभडक आणि सौम्य !

नाटक ना ? मी पाहिलेय -- पण ते तुम्हाला इतके आवडले त्याचे इथे काय ?

अहो, सामाजिक, राजकीय परिवर्तन करणे या एकमेव हेतूने साहित्य निर्माण व्हायला हवे अशी ' भूमिका ' असलेले खूप आहेत -- ते चळवळीत असतात की नाही हा वेगळा मुद्दा आहे -- साहित्य हे क्रांतीचे हत्यार असते असे काहीजण मानतात -- समजा तुम्हालाही ते पटत असेल -- पण, माझ्यासारख्या काहींना ते नाही पटत -- यावर मी खूप सविस्तर लिहिलेलेही आहे --

सगळे राजकीय असते -- भूमिका घ्यायला हवी -- हे कोण म्हणते ? सामाजिक, राजकीय परिवर्तन हेच साहित्याचे काम आहे, असे कुणी नाही म्हणत ?

हे मीच लिहिले आहे -- no particular person --या अर्थी -- dictionary meanning 00 no person : not anybody -- असे दिलेले आहे.

कारण ती फक्त माझ्या कल्पनेत आहे !

खरे तर तिने एकाही फोटोत सुंदर दिसू नये -- प्रॉब्लेम होतात ! ( मी दुसऱ्या व्यक्तीबद्दल बोलतोय ! )

मी रागावतबिगावत नाही -- पण इथे चाललेल्या संपर्कात नुसताच विक्षेप तुम्ही आणू नये, असे वाटते -- कोणतेही लेखन सर्वांना नाही आवडू शकत -- लेखकाची-कवीची तशी अपेक्षाही नसावी -- कलेबाबतच्या आपल्या मूलभूत आकलनातच फरक असू शकतो -- त्याला इलाज तरी काय असणार ? म्हणून म्हटले, ' द्या सोडून -- '

इतके सविस्तर लिहावेसे नाही वाटले -- पण, एकदा जरूर बघावा, एवढे म्हणेन !

गोड मौन बाळग !

म्हणजे साहित्यिकांनी अर्धाच संघर्ष करायचा ?

अलग असून अलगतावादी नसणे ! वा ! सर्व मानवजात एकमयच आहे मग ! मग कसली सत्ता आणि कोण विरोधक ?

हीनत्व नसणे म्हणजे पर आप नसणे --

एखादी फांदी खाणारे आणि पूर्णच खाणारे -- हाच फरक !

प्रश्न पडत नाहीत असा माणूस म्हणजे मृत माणूस ! -- अशा गांभीर्याने लिहिलेली ही कविता आहे -- हे प्रश्न दिसत नसले तर दिसावेत याची ही प्रक्रिया आहे --

अगदी बरोबर आहे -- आज हीनत्व सगळ्यांच्याच डोक्यांत आहे --

Premanand Gajvee mentioned you in a comment.

Champra Deshpande तुकारामाचे अंभग पाण्यात बुडवणे हीनत्वाचेच लक्षण होते. म्हणजे हीनत्व तिथेही होतेच. चंप्र..........जग समजून घेण्याचा थोडासा प्रयत्न करतो आहे तर....सगळीकडे हीनत्वच भरून असल्याचे दिसते...आणि उदासीनता दाटून येते....त्यावर मात करण्यासाठी शांततेचा आवाज ऐकत बसतो!

कुचेष्टेशिवाय जरा गंभीरपणे बोलता येते का बघा -- हे सर्वांचेच प्रश्न आहेत हे न कळल्यामुळे तुम्ही टिंगल करत बसता --

Champra Deshpande replied to Premanand Gajvee's comment.

सर्वांच्याच मेंदूंची तीच अवस्था तुकारामासमोर !

कुणालाही शहाणे करू शकणारा मी नाही --

या सिनेमाचे यश फक्त पैसे किती मिळवले यातच जोखावे -- सिनेमा रद्दड आहे !

अशा लोकांची संख्या वाढत गेली तर संमेलन छानच पार पडेल असा एक अप्रस्तुत आणि मलाही न पटणारा विचार क्षणभर मनात येऊन गेला !

परिवर्तनवाद्याचे समग्र भान म्हणजे कसे असेल ?

खरे तर तुम्ही माझ्या पोस्ट वाचण्यातही वेळ घालवू नये ! कारण तुम्हाला आवडेल असाच मजकूर त्यांत असण्याची शक्यता नाही !

सर्वांसह आपल्या -- ही एखाद्या गटाची पोस्ट नाहीय ! माझ्या पोस्टच्या बाबतीत तुम्हाला सारखे असे प्राथमिकच प्रॉब्लेम येत असतील तर तुम्ही त्या न वाचणे बरे !

सोचो और खुद जान जाओ --

वर जे मांडलेय त्यावर बोला ना जमल्यास -- किती छान परिवर्तन होईल -- तुम्हाला हे असे का पटत नाही ?

तुमच्या आकलनस्वातंत्र्याबद्दल मी सहिष्णू आहे ! तुमच्या इतकी समज मला नसल्याने ते मला भारी वाटले असावे !

कोण गधडे अशी रचना करत असतील कोण जाणे !

आकलनप्रवाह म्हणा ---

मी यावर माझी पोस्ट दिली आहे --

असा प्रवाह तर मरेपर्यंत चालू राहावाच --

माझी पहिली नोकरी किर्लोस्कर प्रेस. मी तिथे जाऊ लागलो तेव्हा विद्याताई रजेवर होत्या. त्यामुळे मला पहिले काम ' स्त्री ' मासिकाचे दिले गेले. ' प्रथमच आई होताना ' या विषयावर स्त्रियांची पत्रे मागवण्यात आलेली होती. त्या दोनअडीचशे पत्रांचे संपादन करून लेख तयार करणे, हे ते काम होते. सारांश, माझी नोकरीची सुरुवात विद्याताईंचा असिस्टंट म्हणून झालेली आहे ! माझ्या अभिमानाच्या चांगल्या स्मृतींपैकी ही एक ! विद्याताईंना खूप खूप शुभेच्छा !

तुम्हाला साहित्यातले जे पटत नाही ते शब्दमैथून ?

साहित्याचे अमुकच उद्दिष्ट असले पाहिजे, असे नाही -- याला वाव ठेवा म्हणजे झाले !

तुम्हाला काही पटले नाही की असे वाईट अर्थ लावायचे, असे तुम्ही करू नये. कुणी काय आकलन बाळगावे याबद्दल चाललेय. कुणी कोणती मते बाळगावीत, कोणते आकलन व्यक्त करावे, याची कुणी सक्ती करू नये. या प्रकारचे आकलन अनेकांचे आहे, त्याचा अनादर करू नका. अभिव्यक्तिस्वातंत्र्य सगळ्यांना असू द्या.

तुमचे म्हणणे पूर्ण अमान्य !

साहित्य संमेलनात साहित्याबाबत काहीच नको, असे वाटण्यात फॅसिजम आहे.

असे कुणीच म्हणत नसेल तर अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहेच मग अस्तित्वात ! प्रश्नच संपला ! पण तसे होत नाही -- सहगल बाईंनी साहित्याबद्दल बोलले पाहिजे, ढेरे बाईंनी राजकीय मुद्यांवरच बोलले पाहिजे, अशा हेकट आग्रहीपणातून आपण एकमेकांसाठी नरक होतोय !

तुमचे म्हणणे पटण्यासारखेच आहे. ' केलेल्या ' कविता आणि जगण्यातून येणाऱ्या कविता यांत फरक असतोच. काही कवींची आकलनप्रक्रिया व्यक्त होणे हे हजारो कवितांतून होत राहू शकते. याबाबत सामान्यीकरण अवघड वाटते. बाद आणि सवयीचे गद्य लिहिणारेही कमी नसतात.

हे आपल्या एकूणच मानसिकतेचे वर्णन आहे -- तुम्हाला किंवा मला वगळून नव्हे -- स्वतःला वगळून बाकी सगळे वाईट म्हणणे हीच ती मानसिकता !

नक्कीच -- कारण स्मृती इतका दगा नाही देणार मला !

हेकट खात्री म्हणजे फक्त मीच ! बाकी काही असूच नाही शकत !

अरे बापरे ! नीट काळजी घ्या आणि बऱ्या व्हा !

' मी तर बुवा अर्धाच शहाणा ' हे इथे बरोबर दिसतेय -- तरीही, हे आधी ' मीच एक शहाणा ' असेच होते, असे वाटते. लेखक -- राजा पारगावकर. ही घ्या लिंक -- एंजॉय करा --

https://www.youtube.com/watch?v=gWvTAM4Zxbg

मतदानाचा निकष म्हणूनसुद्धा उपयुक्त वाटतेय हे !

ते आठवत नाहीय -- नाटकाचे नाव मुख्यत्वे आठवले ! ते टीव्हीवरही झाले होते.

अरे वा ! आपले एकमत ! तुमच्यात किंवा माझ्यात काहीतरी बिघाड झालाय !

Santosh Saraf mentioned you in a comment.

सर्वोत्तम विनोदी-मंगला गोडबोले. Milind Shintre (माझा मित्र आहे म्हणून नव्हे, तो निकष असता तर त्याचे नाव पाहिले लिहिले असते.), मुकुंद टांकसाळे, दिलीप प्रभावळकर, शिरीष कणेकर.
सर्वोत्तम नाट्यकार- चंप्र देशपांडे. Champra Deshpande
सर्वोत्तम स्फुट/वैचारीक वगैरे-माधुरी पुरंदरे
अनेकानेक आहेत. आम्हीच कमी वाचतो.

आपणच फक्त नेमके -- बाकीचे फॅसिस्ट -- असेच ना ?

यातले सत्य सांगणारा फॅसिस्ट कोण ?

ते झाड फणसवादी आहे की फणसगामी ते सांगा कारण त्याला हार घालायचा की लाथ हे त्यावर ठरेल !

Shridhar Tilve mentioned you in a comment.

Champra Deshpande dhanyawad

मत, आकलन मांडायचे पण हिंसक व्हायचे नाही -- असे जमेल का याचा विचार कर.

हेकटमध्ये समजुतीचा अभाव -- सहिष्णुतेचा अभाव, हा अर्थ नीट येतो म्हणून तसे म्हटले आहे.

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande हे तुमचे उदाहरण रास्तच आहे. पण माझ्या मते ह्यासाठी ' खात्री ' नाही तर 'अपेक्षा ' हा शब्द समर्पक ठरेल. हेकट शब्द तसा नसून चालण्यासारखा वाटतो. खात्रीच वापरायचा तर ' हेकट ऐवजी 'ठाम' चालला असता.

Satish Tambe एक उदाहरण देऊन मीही थांबतो -- पुरुषोत्तम बोरकर नामक साहित्यिकांच्या मते डॉ. अरुणा ढेरे यांनी अमुक करायला हवे होते -- तसे त्यांनी केलेले नाही -- त्या अर्थी त्या ' पदासाठी लाचार आणि पुणेरी स्वभावाच्या ' आहेत, असे त्यांनी म्हटलेले आहे ! स्वमताची कितीही खात्री असो, दुसऱ्याचे आकलन, मत यांचा असा अधिक्षेप हा अनादर आणि तुच्छतेत मोडतो -- तो फॅसिजमच आहे ! ( पुणे सकाळ पान ५ ).

दोन्ही ग्रुपमध्ये राहायचे, दोन्हीकडे विरोधी मते मांडायचे स्वातंत्र्य घ्यायचे आणि सगळ्यांची डोकी उठवायची !

हेकट खात्री म्हणजे सहिष्णुतेचा अभाव -- इतर मतांनाही वाव असतो हे विसरूनच जाणे.

Satish Tambe mentioned you in a comment.

Champra Deshpande खात्री हेकट असते का ? आग्रह / सक्ती हेकट असतात . खात्री नि:शंक म्हणून गाफील असते . मला कोण मारणार नाही अशी खात्री असेल तर लोक security बाळगणार नाहीत ,

हे कळले नाही.

वरील वाक्य पुन्हा वाचावे --

तुमच्या मताबद्दल आदर राखून ते अमान्य !

सत्तेत असणाऱ्यांनाच होऊ शकतो
सामान्यांना अशक्य.

डोक्यात तशी खात्री बाळगणे हाच रोग आहे -- लक्षणे व्यक्त होतातच !

या पोस्टचा विषय वेगळा चाललाय --

तुमच्या आकलन-स्वातंत्र्याबद्दल मला सहिष्णुता आहे !

" एकदा सर्वांना कळायला हवे की माझी भूमिकाच बरोबर आणि सर्वांच्या हिताची आहे -- ते कळले की सर्वांची भूमिका एकच होईल -- मग सहिष्णुतेचा प्रश्नच राहणार नाही ! पण प्रॉब्लेम असा दिसतोय की माझी भूमिका काहींच्या विरोधात आहे ! "

मतस्वातंत्र्य आणि सहिष्णुता असू देऊ या --

तुम्हाला ते पटते हे समजले -- यावर नाहीच होणार आपले एकमत --

चांगला लेखक न्यायाधीशाची भूमिका नाहीच घेत -- या विषयावर आपला सपशेल मतभेद --

No -- not acceptable.

सारांश, आदर्श असे काही असू शकते का, या प्रश्नाला उत्तर नाही !

याच्या उलट माझे असते -- मी एखादी भाजी वा आमटी कधी केली की दिवसभर ' वा, छान ! ' असे म्हणत राहणे खाणाऱ्यांना बंधनकारक असते !

www.champralekhan.com ही वेबसाईट आहे -- तिचा मराठीतल्या ई-साहित्य संमेलनातसुद्धा उल्लेखही होत नाही -- इतकी नाटके, एकांकिका, कविता, वगैरे लिहूनही मी अजून नवोदित म्हणूनही कुठे मान्य नसतो !

Champralekhan

champralekhan.com

अत्यंत महत्त्वाचे सत्य !

तीच तर गंमत आहे !

सुरुवात आपण करायचीच नाही -- आपण कुणाचीतरी बाजू घ्यायची -- म्हणजे एकटे पडावे नाही लागत !

राज-ओवेसी-प्रकाश यांचे सहकार्य घेऊ इच्छिणाऱ्यांबद्दल ही पोस्ट आहे.

मराठी नाटकात, पूर्वी, बिघडलेला दीर वहिनीच्या प्रभावाने सुधारत असे !

Raj Kulkarni's photo.
वा ! छानच ! ' तुझे ' अलिबाग कायम आणि मजेत स्मरणात आहे ! या अजब कलाकाराला अभिवादन !

'सुप्रसिद्ध लेखक वामन तावडे यांनी काढलेले अरुण होर्णेकर यांचे रेखाचित्र'
शुभेच्छा !